ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मार्च २०१०


मूल्य १० रुपये

## मुजरा शाहिराला



शाहीर विठ्ठल उमप

## अवलिया संपादक



बाबुराव पटेल

## 'मोबाइल'दाता सुखी भव!



## 'विश्वचरित्रकोश'कार



श्रीराम कामत

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**मार्च २०१०**
**वर्ष ३० वे, अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची - वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.,

मराठी भाषा दिवस सालाबादप्रमाणे सार्वत्रिक उत्साहात साजरा झाला. यात प्रेमाचा भाग किती आणि कर्तव्याचा किती हा प्रश्न विचारणे अनेक मराठी प्रेमींना कदाचित मर्यादाभंग वाटेल. परंतु या दिवशी एक सोडता झालेल्या सर्व कार्यक्रमांमधील सरासरी वयोगट ४०च्या पुढील होता. अपवाद म्हणजे कौशल इनामदार यांनी आयोजित केलेला 'मराठी अभिमानगीता'चा ठाण्यातील सोहळा. त्यात विविध वयोगटांतील कलाकारांचा सहभाग होता. तो गाण्यासाठी की मराठीसाठी असा प्रश्न करणे हेदेखील अप्रस्तुत ठरण्याची शक्यता आहे.

गेल्या काही वर्षांत मराठीबद्दलची जागरुकता राजकीय क्षेत्रात वाढत चालल्याचे दिसत आहे. त्याचे प्रत्यंतर गतवर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये आले. मराठी माणसे अगदी मराठीच्या मुद्यावरही एकत्र येऊ शकत नाहीत या कटु वस्तुस्थितीवर या निवडणुकांनी शिक्कामोर्तबच केले. याचे प्रतिबिंब मराठी भाषा दिवसाच्या कार्यक्रमांमधून मात्र नाही.

'राजकारणापासून आम्ही दूर' ही जणू घोर प्रतिज्ञा केल्यासारखे साहित्यिक आपल्याच विश्वात मश्गुल होऊन गेले. याउलट राजकीय मंडळींनी कोणताही संकोच न बाळगता मराठी भाषा दिवसाच्या व्यासपीठाचा वापर करून घेतला. काही ठिकाणी तर राजकीय कार्यक्रम प्रथम आणि मराठीचा दुय्यम अशी परिस्थिती निर्माण झाली. ती करणारेही मराठीजन होते हे त्यातल्या त्यात चांगले घडले. अन्यथा एखादा अनवस्था प्रसंग ओढवू शकला असता.

सुदैवाने, मराठी भाषा दिवसाच्या आगे-मागे प्रसिद्ध झालेले वृत्तपत्रीय लेख बरेच बोलके होते. मराठीकडील दुर्लक्ष आणि मराठीबाबतची अनास्था यांच्यावर पुन्हा एकदा प्रकाश टाकण्यात आला. हा सुद्धा एक वार्षिक उपचार झाला आहे. साधारण महिनाभरात, म्हणजे 'अखिल भारतीय' मराठी साहित्य संमेलन मार्चअखेर पार पडले की हा ज्वर ओसरू लागेल. मराठीचे पुनरुज्जीवन आणि विकास यांच्याबद्दल तावातावाने बोलणारे गुपचुप मे महिन्यात कोठे जायचे याचे बेत आखू लागतील. दरम्यान पाणीटंचाई आणि भीषण दुष्काळाच्या ब्रेकिंग न्यूज वातानुकूलित घरात बसलेल्यांनाही घाम फोडतील. हळूहळू, मराठीचा विषय मागे पडल्यासारखे वाटत असतानाच एक मेच्या 'सुवर्ण महोत्सवी' मुहुर्तावर मराठीचे गोडवे गाण्याची अहमअहमिका लागेल. त्यात कोण-कोण हात मारून घेणार याची यादीच तयार असेल. एखादे पॅकेजही जाहीर करण्यात येईल. महाराष्ट्रीय संस्कृतीचे सर्व मंगल करण्यासाठी मध्यंतरी नेमण्यात आलेल्या एक समितीचा अहवालही यथास्थित वापरण्यात येईल. दरम्यान राज्य शासनाला गेली दहा वर्षे मराठी भाषा संचालक हे पद भरता आलेले नसल्याचा सोयीस्कर विसर सर्वांनाच पडेल.

सगळे काही सुखेनैव चालू राहील. स्वत:चा मराठीपणा अभिमानाने मिरवणारे दरमहा किंवा दरसाल मराठी पुस्तक खरेदीवर किती रक्कम खर्च करतात असे विचारल्यास मिळणारा प्रतिसाद भयानक असेल. ते किती मराठी चित्रपट पाहतात? मराठीच्या संवर्धनासाठी किती वेळ देतात? आपल्या कार्यालयात कोणती भाषा बोलतात? हे आणि असले प्रश्न सर्वांनाच अडचणीचे, म्हणूनच नकोसे असतात. एकदा मराठी भाषा दिवस साजरा केला की सुटलो; महाराष्ट्र दिनाचा समारंभ दूरचित्रवाणीवर पाहिला की माझे कर्तव्यपालन झाले असे उघडपणे सांगणारे मराठीजन आजकाल भेटू लागले आहेत. त्यामुळेच मराठीबद्दल शंकेची पाल चुकचुकते.

'मराठी माणूस' हा आता बाजारातील एक घटक झाला आहे. योग्यवेळी त्याचा वापर करायचा आणि नंतर पहिले पाढे पंचावन्न चालू ठेवायचे हे कालमान्य झाले आहे. त्याविरुद्ध कोणी काहीही लिहिले तरी काय फरक पडतो?


**-संपादक**

# मुजरा शाहिराला

**अशोक हांडे**

शाहीर विठ्ठल उमप यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार मिळाला आणि आपल्या बिरादरीतल्या माणसाला पुरस्कार मिळाल्यामुळे विशेष आनंद झाला. संगीत नाटक अकादमी म्हणजे लई भारी! मोठ्या मोठ्या कलावंताची मिरासदारी. तिथे लोकसंस्कृतीतील एका पठ्ठ्याला पुरस्कार मिळतो म्हणजे काय, साधी गोष्ट आहे का? लोकसंस्कृतीकडे बघण्याचा विद्वानांचा दृष्टिकोन तसा चांगला नाही. त्या मंडळींना शेला-पागोट्यांचा मान देऊन घडिभर कौतुक केलं की झालं काम... त्यांनी आपलं मोठेपण मान्य करावं म्हणून त्यांचं घडिभर कौतुक करायचं हाच शिरस्ता. म्हणूनच, परिस्थितीशी झगडून, रक्ताचं पाणी करून, लोकांमध्ये मिसळून, तळागाळातल्या समाजाच्या व्यथा मांडणाऱ्या या लोककलाकारांचं कौतुक राष्ट्रीय पातळीवर व्हावं यापेक्षा आनंद कोणता?

महाराष्ट्र म्हणजे लोककलाकारांची खाण. प्रत्येक वाडीवस्तीवर, गावात, तालुक्यात, शहरातील गल्लीबोळात, झोपडपट्टीत हे लोककलाकार उगवत गेले, वाढत गेले. ग्रामीण समाजजीवनाच्या शुद्धिकरणाला आवश्यक असलेले हे बलुतेदारच. कला दाखवायची आणि मिळेल त्यात भागवायचं, गावागावातून हिंडायचं, लोकांचं मनोरंजन करायचं, जमल्यास त्यांना थोडाफार शहाणपणा शिकवायाचा अन् कौतुक करून घ्यायचं हे त्यांचं जीवन. त्यांची पालं मात्र पडायची गावाबाहेर. कलेची ऊर्मी, साथसंगत आणि पोटापाण्यासाठी ही मंडळी घडत गेली, स्वत:ला टिकवत गेली आणि समाजस्वास्थ्यासाठी जगत गेली. लोककलाकारांचा जन्मच मुळात सामाजिक तळमळीतून झाला आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यात सभोवतालच्या समाजाचं प्रतिबिंब दिसतं. त्यांना कधी चंद्रचांदण्या आठवल्या नाहीत की प्रेमपाशाची दिवास्वप्नं पडली नाहीत. कवीकल्पनेत ते कधी रमले नाहीत, की कधी वैयक्तिक दु:खाचा बाजार त्यांनी मांडला नाही. जे काही बोलायचं ते थेट आणि रांगडं. चमचमत्या दुनियेनं त्यांना कधी भूलवलं नाही, कधी पैशांच्या लोभानं त्यांची निष्ठा ढळली नाही. त्यांचे विषय असतात जितीजागती माणसं आणि मक्सद असतो समाजचं काहीतरी देणं.



अशाच परंपरेतले शाहीर विठ्ठल उमप. विठ्ठलाच्या नावाप्रमाणेच काळाकभिन्न रंग, पण अंतरी सामाजिक तळमळीच्या शुभ्र ज्वाला. मूळ नागपूरची ही उमपमंडळी पोटापाण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील चिकनी ह्या गावी स्थायिक झाली. तिथं भागेना म्हणून मुंबई गाठली. इथे आली ती नायगावसारख्या कामगार वस्तीत. तिथं विठ्ठलचा जन्म झाला. वडील गंगाराम रेल्वेत फिटर होते, पण दारूच्या व्यसनापायी सतत हलाखीची परिस्थिती. पोरानं पैलवान व्हावं अशी बाची इच्छा तर माय बजाबाईला इठ्ठलानं डॉ. आंबेडकरांसारखं शिकावं असे वाटे. पण पोराचं मन ना कसरतीत रमे, ना शाळेत. त्यानं हाती धरलं बुलबुलतरंग आन् तो गाऊ लागला. पैशांसाठी मोलमजुरीही करून बघितली पण नशिबात गायकच व्हायचं होतं. मग पोटापाण्यासाठी का होईना कलेची संगत धरली ती कायमची. कलाकारी करत-करतच कला शिकत गेला, साथसंगतीमुळे हुशार होत गेला. बालपणी खेळात रमला नाही की तरुणपणी वाईट नादाला लागला नाही. सभोवतालच्या लोकांचं भेसूर जगणं त्याच्या संवेदनाशील मनावर आघात करत राहिलं आणि मग त्यावरील राग आणि उपाय यासाठी हा कलंदर कलाकार तळमळीनं काम करत राहिला. हे करताना स्वत: कलाकार म्हणून मोठा होत राहिला. आपल्या विनम्र स्वभावानं



एकेक उंची गाठत राहिला.

संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार आतापर्यंत महाराष्ट्रातील अनेक लोककलाकारांना मिळाले. वगसम्राट दादू इंदूरीकर, नृत्यबिजली विठा भाऊ मांग नारायणगांवकर, तमाशापटू काळू-बाळू, लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर, सत्यभामाबाई पंढरपूरकर, दशावतारवाले बाबी नालंग, गोंधळमहर्षी राजरामभाऊ कदम ही सगळी माणसं त्यांच्या त्यांच्या एका विशिष्ट सादरीकरणशैलीमुळे खूप मोठी कामगिरी करून गेली. विठ्ठल उमप मात्र या सगळ्या कलाप्रकारांना गवसणी घातलेले एक हरहुन्नरी कलाकार आहेत. बुलबुलतरंग वाजवून त्यांनी कलेचा श्रीगणेशा केला. चाळीच्या पटांगणात गाणी गाऊन बघ्यांची गर्दी जमवली. शिमग्यात सोंगं सजवली, संस्कारकेंद्रात रमले, चित्रपटात मॉबमध्ये काम मिळावं म्हणून श्री साऊंड स्टुडिओच्या दारात तासन् तास् उभे राहिले. सत्यनारायणाची पूजा, लग्न, बारसं... मिळेल तिथं गात राहिले. शेतकरीगीतं, धनगरीगीतं, कोळीगीतं, भजनं, भारुडं इथपासून आंबेडकरी जलसे आणि कव्वाल पार्ट्यांमध्ये गाऊन नाव कमावलं. राष्ट्रीय सेवा दलाच्या महाराष्ट्रदर्शनमध्ये अदाकारी पेश केली आणि 'विठ्ठल उमप पार्टी' या नावानं अख्खा महाराष्ट्र, संपूर्ण देश आणि परदेशही गाजवला. नायगावच्या विजय नाट्य मंडळात हौशी रंगभूमीवर 'हर हर महादेव', 'जिंजीहून सुटका' यांसारख्या नाटकांतून कामं केली. व्यावसायिक रंगभूमीवर अरुण सरनाईक, मोहन कोठीवान यांच्यासारख्या कलाकारांबरोबर 'हैदोस' नाटक केलं. कामगार कल्याण मंडळाच्या वतीनं आकाशवाणीवर त्यांनी प्रवेश केला आणि पुढे लोककलांचे भरपूर कार्यक्रम केले. एच.एम.व्ही.मध्ये सतत पाच वर्षे खेटे घालून अखेर प्रवेश मिळवला आणि लोकगीतं, कोळीगीतांच्या असंख्य रेकॉर्ड गाजवल्या. मधुकर पाठक, श्रीनिवास खळे, राम कदम यांच्यासारख्या दिग्गज संगीतकारांसाठी ते गायले. दूरदर्शनसाठी 'जिवाची मुंबई' हे लोकनाट्य सादर केलं व नंतर लोकगीतं दूरदर्शनच्या माध्यमातून घराघरात नेली. अनेक चित्रपटांत गायले, अभिनय केला. असं विचारा, की या माणसानं काय केलं नाही? गल्लीपासून दिल्लीपर्यंत आणि आंबेडकरी जलशांपासून 'आंबेडकर' चित्रपटातील अभिनयापर्यंत सर्वत्र आत्मविश्वासानं वावरले आणि प्रत्येक ठिकाणी आपला ठसा उमटवीत बाजी मारली. महाराष्ट्राच्या इतिहासात असा कलाकार विरळाच.

हा मनस्वी कलाकार जिथं जिथं भजनं, भारुडं, कव्वाल्या चालत तिथे रात्र-रात्र घालवत होता. जे जे ऐकलं ते एकलव्याप्रमाणे आत्मसात करत होता आणि स्वत: गात होता. इस्माईल आजाद, जानीबाबू अशा कव्वालांचे जलसे ऐकत-ऐकत गोपाळ कर्डक यांच्या कव्वाल पार्टीत सामील झाला. 'समाजपरिवर्तनासाठी कला' हा निर्धार मनात कायम होता. अण्णाभाऊ साठे, गोपाळ कर्डक, गोविंदराव मशीलकर, श्रावण यशवंते, वसंत बापट यांच्यासारख्या चळवळीतल्या कलाकारांच्या खांद्याला खांदा लावून जनजागरणासाठी लढत होता.

खरा बहरीचा काळ आला तो त्यांच्या आवाजातील एच.एम.व्ही.नं काढलेल्या रेकॉर्डमुळे. त्यातून घराघरात हा आवाज पोचला. स्वत: लिहिलेल्या

*'ये दादा हावर ये, कवरा वाटा लावला मोटा ।*

*बोंबील, वाकटी, कोलंबी काटी, हाणला म्हावरा झे रे झे ।'* या गाण्यानं त्यांच्या लोकप्रियतेची सुरुवात झाली. मग,

*'आज कोलीवाड्यात येईल वरात।*

*लगीन हाय दारात बाय गो।'* यासारखी पारंपरिक गीतं.

*'फाटकी नोट मला घेवाची नाय ।*

*धंद्यात खोट मना खावाची नाय ।'* यासारखी कुंदन कांबळेची गीतं.

*'घेऊनशी जा रं ताजा ताजा ।*

*चिकना चिकना म्हावरा माझा ।'* यासारखी कोळीगीतं

*'क्रांतिबा महात्मा फुले, वीर जन्मले, सुधारक झाले ।*

*जातिवाद्यांचा करी धिक्कार, घेतला गरिबांचा कैवार ।*

*झुंजला कठोरांशी अनिवार जी जी जी ।'* यासारखे पोवाडे

*'माणुसकीला ही बाटवी, दारूची बाटली ।*

*मसणात झणी पाठवी, दारूची बाटली ।'* यासारखी लोकगीतं

*'ऐका बंधूनो माझी ही गोठ, संसाराची मी बांधून मोट ।*

*तुम्हासाठी जाळीले पोट, सांगे भीमाचे हे एक बोट ।'* यासारखी आंबेडकरी गीतं

*'शाहिरांनो थाप डफाची सीमेवर वाजवू।*

*वीरश्रीच्या रणगीतांनी चला हो रण गाजवू ।'* यासारखी समरगीतं त्यांनी आकाशवाणीवर गायली. सर्वांत कहर केला तो मात्र

*'फु ऽऽ बाई फु ऽऽ फुगडी फुऽ।*

*दमलास काय माझ्या गोविंदा तू ।'* या भारुडानं. तुकोबारायांचं हे भारुड त्यांनी घराघरापर्यंत पोचवलं आणि ते स्वत:ही खऱ्या अर्थानं जनसामान्यांपर्यंत पोचलं.

जमाना बदलत गेला तसे तेही बदलत गेले, पण विचारांनी नव्हे फक्त माध्यमांनी. अशोकजी परांजपे यांच्या नेतृत्वाखाली इंडियन नॅशनल थिएटरनं लोककला विभाग सुरू केला आणि विठ्ठल उमपांनी नाटकांतून काम करायला सुरुवात केली. अबक दुबक तिबक, खंडोबाचं लगीन, विठो रखमाय यांसारख्या नाटकांमधून लोककलावंताची अस्सल अभिनयक्षमता त्यांनी दाखवली. कहर केला तो 'जांभूळ आख्यान'नं. परभणीच्या गोंधळमहर्षी राजारामभाऊ कदम यांचा वारसा त्यांनी उंचीवर नेऊन ठेवला. गण झाला की गवळणीमध्ये 'कृष्णविलास' सादर व्हायचं. त्यात ते राधेची भूमिका करत. पुढे गोंधळी रूपात सूत्रधार म्हणून त्यांचा सहजसुंदर वावर आणि 'कर्णाला पाहून, द्रौपदीचं मन पाकुळलं' म्हणत केलेला द्रौपदीचा लाजवाब अभिनय, केवळ लाजवाब! त्याच गोंधळी वेषात ते जणूकाही परकायाप्रवेश करत. प्रेक्षक त्यांच्यावर अक्षरश: फिदा होत. कला आणि कलाकाराची हीच तर खरी किमया!

दूरदर्शन हे माध्यम आल्यावर भल्याभल्या कलाकारांची भंबेरी उडाली पण विठ्ठलरावांनी हेही माध्यम कवेत घेतलं. 'जीवाची मुंबई'सारखं लोकनाट्य दूरदर्शनवर सादर करून ह्या माध्यमावर पकड बसवली आणि लोकसंस्कृतीचे असंख्य कार्यक्रम सादर केले. पुढे चित्रपटसृष्टी त्यांना खुणावू लागली. नामदेव व्हटकरांच्या 'आहेर'मध्ये ते पहिल्यांदा पडद्यावर दिसले. मग 'पायगुण', 'जन्मठेप', जब्बार पटेलांचा 'आंबेडकर' आणि अगदी अलिकडे मंगेश हाडवळेचा 'टिंग्या'. इकडेही तेवढीच हुकूमत.

एवढ्या सगळया धबडग्यातही त्यांच्यातील कवी कधी विझला नाही. असंख्य लोकगीतं, पोवाडे, कोळीगीतं, भीमगीतं, समरगीतं त्यांनी लिहिली, स्वत: चाली लावून पहाडी आवाजात सादर केली. हिंदीमध्ये गझला लिहिल्या, कव्वाल्या लिहिल्या, लोकगीतं लिहिली. संत साहित्य, पंत साहित्य, तंत साहित्य, लोकसाहित्य आणि खासकरून आंबेडकरी साहित्याचा अतिशय सखोल अभ्यास केला. आपल्या शाहिरीतून जनसामान्यांना जगण्याचा मार्ग दाखवला. त्यांची 'रंग शाहिरीचे', 'माझी आई भीमाई' आणि आत्मचरित्र 'फु ऽऽ बाई फु ऽ' ही पुस्तकं प्रचंड गाजली. त्यांनी लिहिलेली देवीची गीतं तर इतकी पारंपरिक वाटतात की काव्यात 'विठ्ठल बाळा देई बळ' ही शेवटची ओळ येईपर्यंत आपण जुनंच काही वाचतो आहोत असा भास होतो. 'पहिल्या धारेची' हा त्यांचा काव्यसंग्रह इतका छान जमला की 'मधुशाला'शी त्याची बरोबरी करावीशी वाटते. संपूर्ण विनोदी ढंगानं लिहिलेलं हे काव्य मद्याची महती सांगता सांगता डोळ्यात अंजन घालतं आणि विशेष म्हणजे हा माणूस आयुष्यात दारूच्या थेंबालादेखील शिवलेला नाही!

अशा या बहुआयामी कलाकाराची मुशाफिरी आज ऐंशीव्या वर्षीदेखील तितक्याच उत्साहानं सुरू आहे. स्वत:च्या मुलांनी सुरू केलेल्या 'मी मराठी' या कार्यक्रमात तितक्याच समर्थपणे ते गातात आणि लीलया वावरतात. अनेक चॅनेल्सवर लोकसंगीत म्हणजे विठ्ठल उमप हे समीकरण आजही अबाधित आहे. वसंतराव नाईकांपासून इंदिरा गांधींपर्यंत सगळ्यांना आपल्या शाहिरीतून विचार करायला लावणारा हा अस्सल मातीतील विठ्ठल! आपल्या अभिनव सादरीकरणानं १९८३ साली लंडनच्या 'कॉर्क आयलंड' येथील आंतरराष्ट्रीय लोकसंगीत महोत्सवात भारताला प्रथम पारितोषिक मिळवून दिलं. आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळवले पण 'दलित मित्र' ह्या पुरस्कारानं भावूक होणारा हा दलितांचा खरा मित्र, गरिबांचा कैवारी अन् माणुसकीचा विनम्र पाईक. बापानं त्याला पैलवान व्हायला सांगितलं, आईनं आंबेडकरांसारखं शिकायला, पण तो दोघांच्याही इच्छा पुऱ्या करू शकला नाही. खरं म्हणजे तळागाळातला समाज हाच त्याचा बा आणि माय. त्या समाजाचं ऋण मात्र त्यानं पुरेपूर फेडलं. कधी कुणाशी भांडला नाही, कधी कंपूशाही नाही केली. जे घडत गेलं ते सोसत गेला. कलेशी इमान राखलं. आजही रंगमंचावर प्रवेश केल्यावर त्याच्या अंगात वारं भरतं, एकदा भूमिकेत शिरला की वय दिसत नाही. जिथं जाईल तिथं बाजी मारणारा हा बाजिंदा गडी फुले, आंबेडकरांचे विचार कधी विसरला नाही. कलेसाठी झटला, कुटुंबासाठी राबत राहिला आणि समाजासाठी अजूनही तळमळतोय.

ह्या अवलियाबद्दल एवढंच म्हणावं, की दुसऱ्यांच्या दु:खानं स्वत:च्या डोळ्यांत पाणी येणारा हा माणूस आपल्यात वावरतोय हे आपलं भाग्य...

**– अशोक हांडे**
९८२१० ८२८०४
चौरंग,
३, युनायटेड हाउस,
मनमाला टँक रोड,
माटुंगा (प.), मुंबई–४०० ०१६.
chaurang.ashokhande@gmail.com

# बाबुराव पटेल : एक अवलिया संपादक

## शशिकांत गद्रे

बाबुराव पाटील हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. मॅट्रिकसुद्धा उत्तीर्ण न झालेला मुलगा. डहाणूजवळच्या हजार-पाचशे वस्ती असलेल्या एका गावात त्यांचा जन्म झाला. वंजारा जमातीतील खेडवळ वातावरण. वडील शिस्तप्रिय. मुलाने अभ्यास करावा, चांगली नोकरी मिळवावी, कलेक्टर वा डॉक्टर व्हावे अशी त्यांची धडपड. मुलगा हूड, पुंड. यामुळे घरात सारखे खटके उडत.

अशा माणसाने इंग्रजी पत्रकारिता करून लक्षावधी रुपये कमावले. व्यावसायिक कारणामुळे ते पाटील हे आडनाव बदलून पटेल झाले. Film India सारखे मासिक त्यांनी धडाडीने चालवून दाखवले. पाली हिलवर 'गिरनार' हा प्रासादतुल्य बंगला बांधला. स्वत:च्या मालकीचे शर्यतीचे घोडे बाळगले. Mother India  हे इंग्रजी मासिक जगविख्यात केले. त्यांच्या परखड अग्रलेखांची शासनाला दखल घ्यावी लागली. इंग्रजी पत्रकारितेत असा संपादक होणे ही एक अद्‌भुत कथाच आहे. इंग्रजी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्त्व होते. ''शब्दकोश, व्याकरणाचे ग्रंथ वाचून, त्यांचा अभ्यास करून मी इंग्रजी भाषा कमावली'', असे ते म्हणत. शब्दकोश वाचून शब्दसंपत्ती वाढेल, पण त्यांनी आत्मसात केलेली इंग्रजी लिखाणाची शैली एम.ए. असलेल्या प्रोफेसरालासुद्धा आत्मसात करता येणार नाही. त्यांची इंग्रजी म्हणजे पाजळलेले धारदार शस्त्र होते. त्यांच्या लिखाणाला पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिगण असे सगळे टरकत असत.

त्यांचे कर्तृत्व, त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी, बहुढंगी होते. होमिओपथीच्या क्षेत्रात त्यांचा अधिकार अखिल भारतात मानला जात असे. शिवशक्ती हे त्यांनी बनवलेले औषध भारतभर तसेच जगात प्रसिद्ध होते, लोकप्रिय होते. त्यांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास गाढा होता. मोठे-मोठे राजकारणी आणि उद्योजक ज्योतिषबाबत त्यांचा सल्ला घेत असत.

चित्रपटसृष्टीत त्यांच्या Film India मासिकातल्या चित्रपट परीक्षणांनी आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाने मोठी धमाल उडवून दिली होती. सिनेमातली बडी धेंडे, सिनेनिर्माते त्यांच्याशी जवळीक साधायला धडपडत असत. त्यांचे सिनेक्षेत्रातील स्थान एवढे उदंड होते की ते अमेरिकेला गेले. त्यावेळी हॉलिवूडमध्ये त्यांचे न भूतो न भविष्यति स्वागत झाले. अगदी लाल गालिचा अंथरून. आपल्या इंग्रजी वक्तृत्वाने त्यांनी हॉलिवुडची दुनिया, नटनट्या यांना भारून टाकले.

राजकारणातही त्यांनी आपली कारकीर्द गाजवली. जनसंघातर्फे मध्यप्रदेशातून ते संसदेत निवडून गेले. लोकसभेमध्ये त्यांनी आपल्या धारदार वक्तृत्वाने छाप पाडली.

बाबुराव पटेल तरुणपणी व्यायामपटू होते. त्यांच्या अंगात ताकद अफाट होती. आपल्या अचाट शक्तीच्या बळाने ते मोटारगाडी ओढत. तसे प्रयोग करून ते पैसे कमावत असत. त्याच काळात ते पाटीलचे पटेल झाले. वयाच्या २२व्या वर्षी त्यांनी शिरीन यांच्याशी विवाह केला. त्यानंतर Film India मासिक चालवत असताना डॉ. सुशीलाराणी पटेल या सौंदर्यवतीशी विवाह केला. डॉ. सुशीलाराणी अतिशय कर्तृत्ववान आणि हुशार होत्या. त्यांचे इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत या भाषांवर प्रभुत्व होते. या बाबुरावांच्या Mother India आणि Film India या मासिकांचे मुद्रितशोधन त्यांनी दीर्घकाळ बिनतक्रार केले. बाबुरावांच्या दोन्ही पत्नी घरात गुण्यागोविंदाने राहत असत. शिरीन पटेल आणि बाबुराव यांच्या विवाहाचा ५०वा वाढदिवस 'गिरनार'मध्ये मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला होता.

अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाबरोबर १० वर्षे मला काम करायला मिळाले हे मी माझे भाग्यच समजतो. ऑक्टोबर २००९ मध्ये बाबुराव पटेल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मी एक इंग्रजी पुस्तिका प्रकाशित केली. Mother India - Editor's Column असे तिचे शीर्षक आहे. या पुस्तिकेमध्ये Editor's Mail मधील ५० व्यंगचित्रे आहेत. प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर गोरे आणि व्यंगचित्रकार चंद्रशेखर पत्की यांचीही व्यंगचित्रे यामध्ये आहेत. माझ्या आधी हे दोघे Editor's Mail सजवत असत. राजकीय व्यंगचित्रे ते लीलया काढत असत. त्यांनी काम सोडल्यावर ते काम सूर्यकांत पटेल, बेबीताई यांनी माझ्यावर सोपवले. मला ते फार मेहनतीने आत्मसात करावे लागले. बाबुरावांसारख्या Hard Task Master ला ते पसंत पडले. त्यासाठी मला स्वत:बद्दल धन्य वाटले.

इथे एक आठवण सांगण्यासारखी आहे. त्याकाळी आम्ही चाळीत रहात असू. मी व्यंगचित्रे काढत असताना आमची मुले आजूबाजूला खेळत असत. कधी माझी तंद्री भंगली की मी त्यांना ओरडत असे. माझी पत्नी म्हणे, ''जगाला तुम्ही हसवता पण आपल्याच मुलांना दटावून.'' बाबुरावांकडे

दहा वर्षे काम केल्याने त्यांचा माझा वारंवार संपर्क होत असावा असे कोणालाही वाटणे स्वाभाविक आहे. तथापि हा गैरसमज आहे, हे मी सांगू इच्छितो. दहा वर्षांत त्यांना मी एकदाही फोर्टमधील Mother India कार्यालयात पाहिले नाही. क्वचित कधी डॉ. सुशीलाराणी 'आकाशवाणी'वरील गाण्यासाठी आल्या म्हणजे डोकावायच्या. माझी गाठ कायम सूर्यकांत, बेबीताई यांच्याशी. त्या दहा वर्षांत मी तीन चारदाच बाबुराव पटेलांना भेटलो असेन.


बिर्ला मातोश्री सभागृहात त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी Blitz चे संपादक रुसी करंजिया होते. त्यावेळी उभयतांना भेटलो. मी शुभेच्छा दिल्या. शिरीन आणि बाबुराव पटेल यांच्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस १९७२ साली साजरा झाला. त्या समारंभाला मी गिरनारवर गेलो होतो. त्यांना भेटलो त्या भाऊगर्दीतच. ते दोघे नंतर युरोप प्रवासास गेले. त्यावेळी मी त्यांना शुभास्तु पंथान: म्हटले. एवढीच पटेलांशी मुलाखत.

Editor's Mail मध्ये जहाल टीका असे, राजकर्त्यांचे वाभाडे काढले जात. Mother India साठी काम करताना सुरुवातीला मी केंद्र सरकारच्या लेखा कार्यालयात कारकुनी करत असे. सरकारविरोधी व्यंगचित्रे काढताना माझी धाकधूक व्हायची.

दोन वर्षांनी मी फोर्टमध्ये फोर्ब्स कंपनीत नोकरी सुरू केली. एक दिवस आमच्या संचालकांनी मला सांगितले की, ''पुढच्या आठवड्यापासून साकीनाका येथील चांदिवली इथल्या कारखान्यात काम करायला जा.'' मी त्यांना सांगितले की, ''फोर्ट मध्ये मी Mother India साठी व्यंगचित्रे काढतो.'' हे सगळे अर्थात भीतभीत. ते म्हणाले, ''नो प्रॉब्लेम! आपला ड्रायव्हर जीप घेऊन रोज नागदेवी हेडऑफिसला येतो. याच्याबरोबर तुझी व्यंगचित्रे पाठव.'' त्यामुळे हे काम चालू राहिले. असा होता पटेलांचा दबदबा.

अशी ही Editor's Mail ची चित्तरकथा. इंदिराजी पंतप्रधान असताना आणीबाणी आली आणि पत्रव्यवसायावर गंडांतर आले. आणीबाणी संपल्यावर परत उभारी घेणे बाबुरावांना जमले नाही. सरकारची वक्रदृष्टी, आयकरविषयक ससेमिरा, यांमुळे Mother India बंद पडले. इंग्रजी पत्रकारितेत मराठी झेंडा डौलाने फडकावणारे बाबुराव पटेल यांचे स्मरण मला आज प्रकर्षाने होत आहे. कारण त्यांच्यासारखे लिखाण हल्ली अभावानेच वाचायला मिळते.


आजचा वृत्तपत्र व्यवसाय हा केवळ धंदा झाला आहे. एक व्रत म्हणून वृत्तपत्र चालवणे जवळपास अशक्य झाले आहे. निखिल चक्रवर्ती यांचे 'मेनस्ट्रीम' किंवा




ए.डी. गोरवाला यांचे 'ओपिनियन' यांची जातकुळीच वेगळी. बाबुराव पटेल कोणाचे अनुकरण करण्याच्या फंदात पडले नाहीत. उलट त्यांनी स्वत:चा अफाट वाचकवर्ग निर्माण केला. एकीकडे राजकारणी तर दुसरीकडे समाजातील अपप्रवृत्तींवर त्यांनी सतत हल्ला चढवला. निर्भय पत्रकारिता कशी असावी याचे बाबुराव मूर्तिमंत उदाहरण होते.

'आज अत्रे असते तर...' असे लेख वेळोवेळी प्रसिद्ध होत असतात. 'आज पटेल असते तर...' असा विचार माझ्या मनात घोळू लागला आणि हा लेख लिहिण्यास मी प्रवृत्त झालो. दुसरे कारण म्हणजे बाबुराव पटेलांबाबत मराठीत अभावानेच लिखाण उपलब्ध आहे. त्यांच्यावरील लेखाने ही त्रुटी अत्यल्प प्रमाणात तरी दूर होईल अशी अपेक्षा आहे.

**– शशिकांत गद्रे**
१, कमलकुंज सोसायटी,
तेजपाल स्कीम, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई – ४०० ०५७.
दूरध्वनी – २६८४ ३१९४



डॉ. बाबुराव पटेल
डॉ. सुशीलाराणी आणि
शिरीन यांच्यासह

# ‘मोबाईल’दाता सुखी भव!

## मेधा कुलकर्णी

माणसांचे एकमेकांपासूनचे अंतर कमी करण्याचे श्रेय कॉम्प्युटरपेक्षा मोबाइल फोनला, टेलिकॉम क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाला जाते हे आपण सतत अनुभवत असतो. नवे तंत्रज्ञान हे मनोरंजन किंवा निव्वळ चैन म्हणून वापरले गेले असते तर या क्षेत्राचा एवढा विकास झाला नसता. मोजक्या श्रीमंत देशांमध्ये तसे ते चैन म्हणून वापरलेही जात आहे, पण गरीब देशातल्या लोकांसाठी ते एक उपजीविकेचे साधन बनत चालले आहे. आपल्याकडे भाजीवाल्या बाया, मासे विकणाऱ्या कोळणी, इस्त्री करणारे भय्ये, रिक्षा ड्रायव्हर अशा हातावर पोट घेऊन जगणाऱ्यांनी मोबाइल फोनचा उपयोग करून घेत आपला व्यवसाय कसा वाढवला आहे ते आपण बघतोच.

परवा एक मैत्रीण सांगत होती की तिच्या ओळखीत एकजण खरवस बनवून देणारा आहे. त्याच्या मोबाइलवर फोन करून ऑर्डर दिली की दुसऱ्या दिवशी खरवस हजर. मोबाइल फोनच्या वापरामुळे भारतात गरिबांच्या, छोटे व्यवसाय करणाऱ्यांच्या जीवनमानात होत असलेली सुधारणा हा अन्य देशांमध्ये चर्चेचा, कुतुहलाचा आणि अभ्यासाचा विषय ठरला आहे. भारतातले मोबाइल टेलिफोनचे मॉडेल गरीब देशांसाठी अनुकरणीय ठरत आहे.

युगांडा देशातल्या एका खेड्यातल्या मेरी नावाच्या गरीब स्त्रीचे आयुष्य मोबाइल फोनमुळे कसे बदलून गेले त्याची गोष्ट नुकतीच ‘इकॉनॉमिस्ट’मध्ये वाचायला मिळाली. स्त्रियांची लग्न लवकर करण्याची परंपरा असलेल्या समाजातील मेरी साठीतच पतवंडे खेळवत आहे. सध्याच्या आयुष्याबद्दल ती समाधानी आहे. हे समाधान कुठून आले? तर आर्थिक विकासामुळे. आर्थिक विकास कशामुळे झाला? मोबाइल फोन वापरल्यामुळे! हे नेमके काय आणि कसे घडले?

सन २००३ मध्ये युगांडातल्या ज्या पहिल्या पंधरा स्त्रियांना गावची फोन ऑपरेटर म्हणून काम करण्याची संधी दिली गेली त्यापैकी एक बुकावेका या गावातली मेरी. ही संधी तशी मोफत नव्हती मिळाली. मोबाइलचा हँडसेट, खात्रीशीर सिग्नल मिळण्यासाठी अँटेना आणि त्यावरचे छप्पर यासाठी तिला अल्प व्याजदराने कर्ज मिळाले. या भांडवलावर सुरू झाला तिचा फोन कॉल्स विकण्याचा व्यवसाय. शेजारच्या




खेड्यापाड्यात ती आपला मोबाइल फोन घेऊन जात असे. लोकांनी केलेल्या प्रत्येक कॉलमागे तिचे थोडे थोडे पैसे सुटत गेले आणि तिचे सगळे कर्ज फिटून गेले. आणखी थोडी कमाई झाल्यावर तिने चक्क दुसरा मोबाइल फोन विकत घेतला. त्यातून मिळणाऱ्या पैशांतून तिने आपल्या घराजवळच बीअरची टपरी टाकली. हळूहळू तिथे म्युझिक-व्हिडिओचे दुकान सुरू केले. त्याचबरोबर कुटुंबातल्या मुलांना शाळेत पाठवायला फीची तरतूदही तिने केली.

गेल्या दोनेक वर्षांत मेरीच्या फोन कॉल्स विकण्याच्या धंद्याला मरगळ आली आहे. कारण मोबाइलचे कॉल्स आणि हँडसेटस् या दोहोंच्या किमती उतरल्या आहेत. मेरीच्या आणि आजूबाजूच्या खेडोपाडी खूप लोकांनी स्वत:चे मोबाइल फोन विकत घेतले आहेत. तरीही मेरीच्या मिळकतीवर फारसा परिणाम झालेला नाही. कारण तिला आता आर्थिक स्थैर्य मिळाले आहे. तिच्या दुकानाला चांगला धंदा आहे. फोन कॉल्स विकण्याच्या व्यवसायामुळे, म्हणजेच मोबाइल फोनमुळे. आजूबाजूच्या गावांत तिच्या भरपूर ओळखी-पाळखी झाल्या. याचा तिच्या दुकानाला चांगलाच फायदा होतो. म्हणूनच मेरी अभिमानाने आणि आनंदाने सांगते, ‘‘मोबाइल फोन हा माझा अन्नदाता, रक्षणकर्ता ठरला.’’

मेरीला ज्या मोबाइल फोनमुळे आर्थिक स्थैर्य मिळाले, त्या फोनवरून कॉल्स घेणे किंवा कॉल्स करणे मेरी आणि तिच्यासारख्याच गरीब लोकांसाठी महत्त्वाचे होते. इतके महत्त्वाचे होते की हे गरीबातले गरीबसुद्धा कॉल्ससाठी पैसे खर्च करत होते. खराब रस्ते, दळणवळणाच्या साधनांची कमतरता, भरवसा नसलेली टपालसेवा आणि न चालणारे लॅण्ड लाईनफोन या साऱ्यांमुळे होत असलेल्या नुकसानाची भरपाई एका मोबाइल फोनमुळे होऊ लागली. प्रवास करण्याला पर्याय ठरू लागला मोबाइल फोन. संपर्क सोपा झाला. माहिती मिळण्या-


देण्याला वेग आला. उद्योग-धंदा करण्यात रस असणाऱ्या पण हाताशी फारसे भांडवल नसणाऱ्या गरिबांसाठी मोबाइल फोनचे तंत्रज्ञान हे वरदानच ठरले, ते असे.

मोबाइल फोनचा वापर हा आता समाजाचा, देशाचा आर्थिक विकास मोजण्याचा एक मापदंड ठरला आहे. अर्थशास्त्रज्ञ सांगतात की विकसनशील देशात प्रत्येक शंभर माणसांमागे मोबाइल फोनची संख्या दहाने वाढली की त्या देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन प्रति व्यक्ती आठ दशांश टक्क्यांनी वाढते. सन २००० मध्ये विकसनशील देशांचा मोबाइल फोनचा वापर जगाच्या तुलनेत २५ टक्के होता. तर २००९ हे वर्ष सुरू होता होता तो ७५ टक्के झाला. वर्ल्ड रिसोर्स इन्स्टिट्यूटने केलेली पाहणी सांगते की विकसनशील देशांची मिळकत जसजशी वाढत जाते तसतसा घरटी मोबाइल फोनवरचा खर्च अन्य वस्तूंपेक्षा, पाणी-वीज यांच्यापेक्षाही, वाढत जातो. भारत, चीन, आफ्रिका या देशांबरोबरच इंडोनेशिया, व्हिएतनाम, ब्राझील आणि रशियातही हे घडत आहे. त्यामुळे खूप मोठे, क्रांतिकारी ठरतील असे बदल सर्वाधिक गरीब देशांमध्ये घडून यायला सुरुवात झाली आहे. गरिबी हटवण्याचे पारंपरिक मार्ग आता आपल्याला बदलावे लागतील असे दिसते. नवे तंत्रज्ञान आपल्यासाठी नवे उपाय घेऊन आले आहे.

**– मेधा कुलकर्णी**
kulmedha@gmail.com



**भिडू**
**भगवान इंगळे**
**मूल्य २५० रुपये,**
**सवलतीत १५० रुपये**



श्री. भगवान इंगळे यांना,
सप्रेम नमस्कार

परवा फोनवर बोलले तेव्हा तुमचं 'भिडू' हे पुस्तक मी अर्धवट वाचलं होतं. तेव्हा अगदी प्रकर्षानं वाटलं म्हणून लगोलग फोन केला. जर पूर्ण पुस्तक वाचलं असतं तर तुम्हाला तडक फोन करण्याचा धीर झाला असता असं वाटत नाही. शेवटच्या 'आगलावे जीवन' या प्रकरणात तुमच्याबद्दल वैयक्तिक माहिती वाचली. तुमच्या लिखाणाचा झालेला योग्य उदोउदो पाहिल्यावर, थक्क होत पुस्तक मिटून ठेवलं असतं.

तसंच तेव्हा 'मी पत्र लिहू शकणार नाही, सध्या माझंच लिखाण चालू आहे', असंही म्हणाले होते. पण सबंध पुस्तक वाचल्यावर ते लिहिल्याखेरीज राहवेना. अनेक दिवसांत इतकं गुंतवून ठेवणारं मराठी पुस्तक माझ्या वाचनात आलं नव्हतं. त्यांतल्या जिवंत व्यक्तिरेखा आणि त्यांच्या जीवनांत घडलेले प्रसंग तुम्ही कमालीच्या ताकदीनं उभे केलेले आहेत. ती सारी माणसं प्रत्यक्ष समोर येऊन माझ्याशी बोलायला लागली. नुसती बोलली नाहीत, अनेकदा त्यांनी त्यांचे हात माझ्या हातात दिले. कधीमधी डोळेही गाळले. त्यांच्या अंगांचा वास, कातडीचं पोत, केसांचं वळण, हसण्याचा नाद सगळं माझ्या दाट परिचयाचं झालं.

त्यांची भाषा आणि संवाद तर अफाटच. भाषा कदाचित बालपणापासून तुमचीच असल्यानं राखणं सोपं असेल. पण त्यांचे संवाद, त्यांच्या शब्दांत जसेच्या तसे टिपणं याला अचाट स्मरणशक्ती हवी. त्यामुळे त्यांना जिवंतपण येणं अपरिहार्य होतं. धन्य आहे तुमची.

आणखी एक आक्रित म्हणजे त्यांच्या तोंडच्या म्हणी. प्रसिद्ध इंग्लिश पुस्तक 'द मॅन फॉर ऑल सीझन्स' तुम्हाला माहीत असेलच. तुमच्या बाबतीत 'अ म्हण फॉर ऑल सीझन्स' म्हणायला हरकत नाही. त्यांचा संग्रह आणि त्या चपलख वापरण्याची हातोटी, दोन्ही महान. तुमचा शिवी-कोशही भरघोस आहे. (त्या सगळ्या समजल्या असत्या तर श्री. प्रभुंनी मला बहुधा सोडचिठ्ठी दिली असती!)

तक्रार एकाच बाबतीत करायची -दर व्यक्तिरेखेत तुम्ही खूप खूप भरलंय. ती घनदाट केली आहे. हा एकीकडून चमत्कार आहे पण दुसरीकडून तो एकेका कादंबरीचा ऐवज आहे. त्या तुम्ही खुलवून, आणखी सुंदर लिहिल्या असत्या. इथं वाचकाला तुम्ही थोडं गंडवलं आहे.

त्याबद्दल शिक्षा म्हणून आणखी 'भिडू' शोधून तुम्ही आमच्यापुढे सविस्तर सादर केले पाहिजेत. तुमच्या पोतडीत अजून खच्चून माल भरलेला आहे याची आम्हाला खात्री आहे. तेव्हा कृपया तुम्ही लिहीत राहा. आम्ही वाचत राहू.

**मीना प्रभु**
१६१, कुबेर टॉवर, नागवेकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
टेलिफोन : ९८२०० १९१५८

# थोर ज्ञानोपासक : श्रीराम कामत

## डॉ. सुभाष भेण्डे

सोमवार १५ तारखेला सकाळी ज्येष्ठ स्नेही मनोहर नाईक यांचा फोन आला. रुद्ध कंठातून शब्द उमटले,''फार वाईट बातमी आहे.'' मी विचारले, ''कुणाविषयी?'' ''आपले श्रीराम पांडुरंग कामत गेले. आज सकाळीच... त्यांचा सहावा खंड अपुरा राहिला. बा.भ.बोरकरांचं समग्र वाङ्मय त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षांत ते प्रसिद्ध करणार होते. सगळी जुळवाजुळव चालू होती. परंतु....''

दोन महिन्यांपूर्वी 'धी गोवा हिंदू असोसिएशन'च्या नव्वदाव्या वर्धापनदिनाच्या निमित्त श्रीराम कामत मुंबईला आले होते. संस्थेतर्फे त्यांचा सत्कार झाला. उत्साहात होते. 'विश्वचरित्रकोशांचा अखेरचा खंड' आणि 'बोरकरांचं समग्र साहित्य प्रकाशन' हे दोन प्रकल्प वर्षभरात पूर्ण करून ते निवृत्त होणार होते. हे सगळे तपशीलवार सांगून मला म्हणाले,'' मला आणखी एक वर्ष आयुष्य मिळालं तरी पुरे... परमेश्वरापाशी तेवढीच मागणी आहे. बस्,आणखी काही नको.''

परंतु परमेश्वराने त्यांची प्रार्थना ऐकली नाही. आपल्याला आणखी एक वर्ष मिळणार नाही याचा स्वत: कामतांना अंदाज आला होता असे दिसते. पाच दिवस आधी, १० तारखेला छातीत दुखू लागले तेव्हा त्यांना बेळगावला नेण्याचे ठरले. जाण्यापूर्वी त्यांनी जयराम व अन्य बंधूंना फोन केले. त्यांची निरवानिरवीची भाषा ऐकून भावंडे अस्वस्थ झाली. त्यांना विश्वचरित्रकोशाच्या कामी मोलाची मदत करणारे वाईचे डॉ.सु.र. देशपांडे यांना त्यांनी तातडीने फोन केला. अर्धा-पाऊण तास ते बोलत होते. ''आता माझ्यानंतर उरलेलं काम तुम्हालाच पूर्ण करायचं आहे. अन्य सहकारी मदत करतीलच. पण, मुख्य भार तुम्हालाच उचलायचा आहे,'' असे ते त्यांच्या नेहमीच्या नम्र स्वरात विनवून सांगत होते. ''ठीक आहे. मग बोलू. फार बोलू नका'', असे डॉ. देशपांडे त्यांना बजावत होते.

फार मोठे कार्य त्यांनी अंतिम टप्पापर्यंत आणून पोचवले होते. पण स्वप्नपूर्तीचा आनंद त्यांना उपभोगता आला नाही. मात्र तेहतीस वर्ष अथक परिश्रम करून त्यांनी ज्या जिद्दीने 'विश्वचरित्रकोश' या एकमेवाद्वितीय प्रकल्पाचे शिवधनुष्य उचलले, ती जिद्द वाखाणण्याजोगी आहे. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असताना 'विश्वकोश महाराष्ट्रातला' प्रकल्प आज पंचेचाळीस वर्षांनंतरही रेंगाळत असल्याचा दिसतो. मुख्य प्रकल्प बाजूला ठेवून 'कुमार विश्वकोश', 'बाल विश्वकोश', सी.डी., डी.व्ही.डी. आदी छोट्या-मोठ्या योजनांत निष्कारण वेळ दवडला जातो आहे. विश्वकोशाचा अंतिम टप्पा अजूनही दृष्टिपथात आलेला नाही. या पार्श्वभूमीवर एकट्याच्या हिमतीवर, आर्थिक पाठबळ नसताना श्रीराम कामत यांनी तीस एक वर्षांत प्रचंड काम पूर्णत्वास न्यावे ही मराठी माणसाला अभिमानास्पद वाटावी अशी बाब आहे यात शंका नाही.

श्रीराम पांडुरंग कामत मूळचे अस्नोडा-गोव्याचे. जन्म १७ मे १९३४चा. शिक्षण गोव्यात व मुंबईतील रुपारेल कॉलेजमध्ये. मराठी-इंग्रजी विषय घेऊन एम.ए. झाले. साहित्याची विलक्षण आवड. पत्रकारितेत शिरले. 'गोमांतक' दैनिकात उपसंपादक म्हणून काम केले. नंतर स्वत:च्या हिंमतीवर 'मांडवी' मासिक सुरू केले. १९६२ ते १९७० आठ वर्षे त्यांनी ते मोठ्या उत्साहाने चालवले. लेखकांना इतक्या नम्रपणाने ते साहित्य पाठवण्याची विनंती करत की नकार देणे जीवावर येई. ''मानधन कागद-शाईच्या खर्चाइतकं पाठवत आहे. स्वीकार व्हावा'', अशी भाषा. मराठीचा जाज्वल्य अभिमान. त्यांचा केशवसुत विशेषांक गाजला. 'मांडवी' मासिक गोव्याबाहेर महाराष्ट्रात सर्वत्र जात असे. १९७० मध्ये बा.भ. बोरकर षष्टयब्दीपूर्तीनिमित्त संपादकांनी ३६७ पृष्ठांचा अंक काढला. हा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरला. लवकरच 'मांडवी'चे प्रकाशन थांबले. मुख्य अडचण पैशांची. ती तर मराठी संपादकांच्या पाचवीला पुजलेली.

पुन्हा पत्रकारितेकडे वळावेसे वाटेना. स्वतंत्रपणे काही करता येईल का याचा विचार करताना 'विश्वचरित्रकोशा'ची कल्पना मनात रुजली. जीवनाच्या विविध क्षेत्रांत ज्यांनी कर्तृत्व गाजवले आहे, मानवी प्रगतीच्या जडणघडणीसाठी ज्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे, अशा दिग्गजांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेण्याचा भव्य प्रकल्प त्यांच्या डोळ्यांपुढे आला. त्यासाठी केवढी पूर्वतयारी आवश्यक आहे याची रूपरेषा त्यांना ज्ञात नव्हती. एका अर्थाने ती अंधारात घेतलेली उडी होती. पण कामत जिद्दी होते. 'एकला चलो रे!' मनोवृत्तीचे होते. पणजीला 'इन्स्टिटच्यूट मेनेझिस ब्रागांझा' इमारतीत मोठे ग्रंथालय आहे. मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज भाषांतील हजारो ग्रंथ या वाचनालयात आहेत. कामत सकाळी आठपासून रात्री आठपर्यंत तिथे बसू लागले. मानवी संस्कृतीच्या शिल्पकारांची यादी



डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना श्रीराम कामत. पाठीमागे डॉ. रामाणी व सुयशा काकोडकर

तयार करणे हे प्राथमिक स्वरूपाचे कार्य होते.

पणजीसारख्या एका बाजूला असलेल्या शहरात वास्तव्य करून जागतिक कीर्तीच्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींची यादी तयार करणे सोपे काम नव्हते. जगातील देशोदेशीच्या साहित्यिकांची, चित्रकारांची, राजकारण्यांची, समाजसुधारकांची, शास्त्रज्ञांची, पत्रकारांची, अभियंत्यांची-सर्व क्षेत्रांतील महनीय व्यक्तिमत्त्वांची चरित्रे अकारविल्हे देणे हे अवाढव्य कार्य होते. असा 'विश्वचरित्रकोश' मराठीतच नव्हे तर अन्य भाषांतही नव्हता! रोज १० ते १२ तास वाचनालयात बसून, तहानभूक विसरून, अथक तपश्चर्या करण्याचा त्यांचा ध्यास तीन-चार वर्षे चालू होता. अनेकदा वाचनालयात कामत आणि ग्रंथपाल दोघेच असत. कामतांच्या कामाचा झपाटा पाहून ग्रंथपाल आपली वेळ संपली तरी कामतांना सोबत करण्यासाठी बसून राही. ज्ञानोपासक कामत यांच्यापुढे आदर्श होता ज्ञानकोशकार केतकरांचा. त्यांना आशीर्वाद होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि मूळ गोव्याचे पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे. श्वशुर बा.भ.बोरकर सदैव पाठीशी होते. त्यांनी दिलेले नैतिक पाठबळ लाखमोलाचे होते. वाईच्या विश्वकोश प्रकल्पात अनेक वर्षे काम करणारे अनुभवी कर्मचारी सवड मिळाली की गोव्याला येत. कोशाची तांत्रिक बाजू नेटकेपणाने सांभाळत. कामतांची पत्नी गीताबाई यांनी तर विश्वचरित्रकोशाच्या कामाला पूर्णपणे वाहून घेतलेले.

'विश्वचरित्रकोश' केंद्राची स्थापना पणजीजवळील पर्वरी गावी १६ सप्टेंबर १९७७ रोजी झाली. कविवर्य बा.भ. बोरकर हे केंद्राचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर प्राध्यापक गोपाळराव मयेकर, कोशकार स.गा. देव, प्राध्यापक मे.पुं. रेगे अध्यक्ष झाले. जागतिक कीर्तीचे थोर वैज्ञानिक डॉ. रघुनाथराव माशेलकर सध्या अध्यक्ष आहेत. विश्वचरित्रकोशाचा पहिला खंड अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर ६ मे २००० रोजी तर्कतीर्थांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रकाशित झाला. दुसरा खंड गुढीपाडव्याला, २ एप्रिल २००३ रोजी प्रसिद्ध झाला. पुढील तीन खंड अनुक्रमे २००५, २००७ आणि २००९ साली प्रकाशित झाले. एकूण अडीचशे तज्ज्ञांच्या योगदानातून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आकाराला आला. त्यात सातशे चाळीस क्षेत्रांतील दिग्गजांच्या परिचयांचा समावेश आहे. मराठी विश्वकोशाच्या आकाराच्या, हजाराहून अधिक पृष्ठांच्या एकूण सहा खंडांत हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. पहिल्या पाच खंडांत प्रत्येक खंडागणिक दोन हजार ते पंचवीसशे थोर व्यक्तींची चरित्रे असून सहाव्या खंडात आणखी पाचशे शिल्पकारांची ओळख आहे.

आ.रा. भट यांची 'अंगद' ही नोंद पहिली आणि मयेकरांची 'ज्ञानेश्वर' ही नोंद अखेरची. सहाव्या खंडात संपूर्ण सूची देण्यात येणार आहे. कामत अहोरात्र ही सूची तयार करण्यात गुंतले होते. डॉ.सु.र.देशपांडे त्यांना साहाय्य करत होते. यापुढे सहाव्या खंडाची जबाबदारी डॉ. देशपांडे यांना घ्यावी लागेल असे दिसते. पहिल्या पाच खंडांत राहून गेलेली चरित्रेही सहाव्या खंडात असतील. प्रकल्पास आरंभ झाला तेव्हापासून कामतांना आर्थिक चणचणीला तोंड द्यावे लागले. शासनाकडून अनुदान मिळत नव्हते. काही दानशूर गोवेकरांनी थोडीफार मदत केली. परंतु गरज फार मोठी होती व त्या मानाने आर्थिक साहाय्य तुटपुंजे होते. मिठ्ठास वाणी आणि ऋजू स्वभाव एवढेच कामतांचे भांडवल. खंड प्रसिद्ध होऊ लागले, जाणकारांनी कौतुकाचा वर्षाव केला तेव्हा केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे संशोधनास प्रोत्साहन म्हणून कामतांना प्रतिष्ठित वरिष्ठ छात्रवृत्ती देण्यात आली. छोटे-मोठे पुरस्कार मानसन्मान त्यांच्या वाट्याला आले. आठ वर्षांपूर्वी बायपास शस्त्रक्रियेमुळे कामात खंड पडला. दीड वर्षांपूर्वी पत्नी गीताबाईंचे निधन झाले. कामतांचा आधारस्तंभ मोडून पडला. विरक्ती आली. परंतु, सहावा खंड प्रसिद्ध होईपर्यंत आणि 'समग्र बोरकर' या वर्षाअखेर प्रकाशित होईपर्यंत निवृत्ती अशक्य होती. या दोन्ही योजना अपूर्ण राहिल्या... हाती घेतलेले कार्य तडीस नेण्यापूर्वीच मृत्यूने त्यांना गाठले.

भ्रष्टाचाराने पोखरलेल्या आजच्या समाजजीवनात श्रीराम पांडुरंग कामत यांच्यासारखे ज्ञानोपासक विरळाच म्हटले पाहिजेत. अविरत श्रम करताना पदरी काय पडेल याची कामतांसारख्या नि:स्वार्थी व्यक्तींना पर्वा नसते. समाजातील सध्याचे सांस्कृतिक गढूळ जीवन सुधारण्यासाठी अशा दिग्गजांची गरज आहे. परिस्थिती फारशी अनुकूल नसताना, साधनसामग्रीचा पूर्णपणे अभाव असताना गोव्यामधील एका छोट्याशा खेड्यात ज्ञानयज्ञ धगधगता ठेवणे सोपे नव्हते. प्रारंभीच्या काळात असंख्य गोंयकारांनी चेष्टामस्करी केली, ते करत असलेले काम निरर्थक असल्याचा प्रचार केला, पण कामतांनी आपली उमेद खचू दिली नाही. ते हाती घेतलेले काम शांतपणे करत राहिले.

पूर्तीचा क्षण जवळ आला असताना ते गेले याची चुटपुट सर्वांना लागून राहिल्याशिवाय राहणार नाही.

**– डॉ. सुभाष भेण्डे**
५-ज्ञानदेवी, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.

# डॉ. द.भि. कुलकर्णी : रसिक समीक्षक

**ममता क्षेमकल्याणी**

पुण्यात या महिन्यात होणाऱ्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक डॉ.द.भि.कुलकर्णी यांची निवड झाली आहे. समीक्षक ही त्यांची पहिली ओळख. तर जाणकार संगीत श्रोता आणि ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक हे त्यांचे आणखी काही खास पैलू. संमेलनाच्या निमित्त डॉ.द.भि.सरांच्या काही पैलूंवर प्रकाश टाकण्याचा केलेला हा प्रयत्न...

''आजच्या विज्ञानयुगात असून आपण वैज्ञानिक दृष्टी स्वीकारत नाही, तर मनोरंजनाची दृष्टी स्वीकारतो. दूरदर्शनवर तुम्ही करमणुकीचा कार्यक्रम पाहत असाल तर त्याचा आनंद घेणे बरोबर आहे, मग ते नृत्य असो, संगीत असो किंवा नाटक, सिनेमा, क्रिकेटची मॅच काहीही. पण भूकंप, अवर्षण, अपघात, दहशती हल्ले यांची दृश्येही तुम्ही करमणूक म्हणून पाहत असाल तर तुमची संवेदना बोथट झाली आहे, असे मी समजतो. मालिकांमधील प्रेमप्रकरण ज्या भूमिकांमधून पाहयचे त्याच भूमिकेतून तुम्ही मुंबईवरील हल्ल्याची दृश्ये पाहणे ही संवेदनहीनतेची वृत्ती आहे. सामान्य माणसाला करमणूकवादी, संवेदनाशून्य, विचारशून्य आणि भावनाशून्य केलेले आहे. फार पद्धतशीरपणे ही प्रक्रिया सुरू आहे. मार्क्सवादी ज्याप्रमाणे धर्म ही अफूची गोळी आहे असे म्हणत, त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमे सर्वसामान्यांना मनोरंजनाच्या अफूची गोळी देत आहेत. या सामान्य माणसाची केवळ भाषाच व्यवहारात येऊन चालणार नाही तर या सामान्य माणसाचे वर्चस्व सगळ्या जीवनव्यवहारात आले पाहिजे'', अशा स्पष्ट शब्दांत समाजातल्या वास्तवाबद्दल बोलणारे ज्येष्ठ समीक्षक डॉ.द.भि.कुलकर्णी यांची ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी झालेली निवड केवळ साहित्य क्षेत्रालाच नाही तर संपूर्ण समाजाला अभिमान वाटावी अशीच आहे. कारण एक समाजप्रिय समीक्षक अशीच द.भि.सरांची ओळख.

गतवर्षी द.भि. सरांना पहिल्यांदा भेटायला गेले तेव्हा, मार्च-एप्रिलपैकीच कोणतातरी एखादा महिना असावा, एकेकाळी थंड हवेचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात मार्च-एप्रिलमध्ये रणरणत्या उन्हाने चांगलाच जोर धरला होता. तेव्हा त्या उन्हात आपल्या अंगणातल्या झोपाळ्यावर बसलेले द.भि. सर म्हणाले, ''मी नागपूरकर. जरा पुण्याचं कोवळं ऊन खात बसलो आहे. तू मात्र सावलीतच बस.''

नागपूरचा विषय निघाला आणि ओघानेच वेगळा विदर्भ, बृहन्महाराष्ट्रातील साहित्यिक, महाराष्ट्राच्या साहित्यातले विदर्भाचे स्थान अशा अनेक विषयांवर गप्पा झाल्या. द.भि. सरांशी बोलताना त्यांचे वय, त्यांचे ज्ञान यांचा समोरच्याला कधी अडसर वाटत नाही.


**''नागपुरात मनोरंजनाची साधने नसल्यामुळे साहित्यासाठी तपश्चर्या करावी लागली. मुंबई-पुण्यात प्रसारमाध्यमे सहज उपलब्ध असल्यामुळे येथील साहित्यिकांना प्रसिद्धी लगेच मिळते. पण तपश्चर्येअभावी अशा साहित्यिकांचे साहित्य कच्चे असते.''** - द. भि. कुलकर्णी

द.भि. सरांचा जन्म नागपुरातला. २५ जुलै १९३४, गुरुपौर्णिमेचा. हा दिवस त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी आणि वाचकांसाठीही खऱ्या अर्थाने खूप महत्त्वाचा. अजनीची हम्पयार्ड रेल्वे प्राथमिक शाळा आणि सीताबर्डीच्या कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. धनतोलीचे धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूरचे मॉरिस कॉलेज आणि नागपूर विद्यापीठ विदेश भाषा विभागातून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. वाचन हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. शालेय जीवनापासून मिळालेला हा ठेवा त्यांनी कायम जपला आहे. आपल्या एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपल्या लहानपणाच्या एका आठवणीला उजाळा देताना द.भि. सरांनी लिहिले आहे, ''दादाने एक दिवस अभिरुची-सत्यकथेचे जुने-नवे अंक आणले. मी चाट. अरे, भोवतीच्या जगाच्या आणि आपल्या आतल्या मनाच्या इतके जवळ साहित्य असते? त्या नवसाहित्याने मन क्षुब्ध झाले, लुब्ध झाले, विश्रब्धही झाले: ते साहित्य माझेच आतले आणि बाहेरचे आत्मचरित्र होते. तेव्हा आणि केव्हाही भावे-गाडगीळ, मर्ढेकर-मुक्तिबोध यांचे साहित्य दुर्बोध, अश्लील, परभृत, प्रयोगधार्जिणे वाटले नाही-आपले 'आत्मचरित्र' आपल्याला असे कधी वाटेल काय?''

घरातल्या वाचनप्रिय वातावरणाचा द.भि. सरांना चांगलाच फायदा झाला. धार्मिक ग्रंथांपासून विविध भाषांमधल्या

कथा-कादंबऱ्यांपर्यंत अनेक प्रकारची पुस्तके त्यांना घरातच वाचायला मिळाली. रशियन भाषेचा त्यांनी स्वतंत्रपणे अभ्यास केला. वाचनाचे खोल परिणाम त्यांच्या विचारांवर आणि लेखनावर होणे स्वाभाविक होते. वाचनाबरोबर लेखनाचा लळाही त्यांना लहान वयातच लागला. आपल्या आवडत्या क्षेत्रात सुरू केलेली कामगिरी ते आजही अखंड पार पाडत आहेत. मराठी साहित्यात आपल्या ३७ ग्रंथांद्वारे त्यांनी साहित्य-समीक्षा क्षेत्राच्या विकासात मोलाची भर घातली आहे. समीक्षेला सृजन मानणाऱ्या द.भि. सरांनी कोणत्याही लेखकाची, कवीची समीक्षा त्याच्या वैयक्तिक जीवनाकडे बोट दाखवून केली नाही. मग ते जी.ए. कुलकर्णी असोत किंवा बा.सी. मर्ढेकर! द.भि. सरांनी कवी किंवा लेखकाच्या वैयक्तिक घडामोडींचा पट संदर्भ म्हणूनही फारसा वापरला नाही. त्या त्या व्यक्तीचे साहित्य हेच त्यांनी आपल्या समीक्षेचे मुख्य आधारभूत घटक मानले. आपल्या समीक्षेच्या माध्यमातून अनेक शब्दांची नव्या पिढीला ओळख करून देण्याची मोलाची कामगिरी त्यांनी केली. बरेचदा अनेक नवीन शब्दही त्यांनी निर्माण केले. द.भि. सरांच्या समीक्षेविषयी प्रा.म.द. हातकणंगलेकरांनी लिहिले आहे, ''मराठी साहित्य प्रवाहाची, प्रकारांची, परंपरेची फेरमांडणी करण्याच्या हेतूने त्यांनी लेखन केले आहे. त्यामुळे या टीकालेखनावर त्यांची स्वत:ची अशी मुद्रा आहे. आद्य मराठी कथाकार : चक्रधरस्वामी, मर्ढेकर आणि अभिनवगुप्त, तिसऱ्यांदा रणांगण, तुकारामाची अभंगकला अशा शीर्षकांवरून द.भि.ंची समीक्षादृष्टी कशी स्वतंत्र होण्याचा यत्न करीत होती, याची कल्पना येते.''

द.भि. सरांना साहित्याइतकीच (किंबहुना त्यापेक्षा थोडी जास्तच) संगीतकलेची ओढ आहे. द.भिं.चे लहानपण नागपुरात गेले. त्यावेळी घरातल्या एच.एम.व्ही.च्या अगडबंब ग्रामोफोनवर ऐकलेल्या दिग्गज गायकांच्या रेकॉर्ड आजही त्यांच्या मनात घर करून राहिल्या आहेत. अब्दुल करीम खाँ, हिराबाई बडोदेकर, पंडित नारायणराव व्यास, गंगुबाई हनगल अशी एक ना अनेक नावे. त्यांच्या



द.भि. कुलकर्णी

ताना, मुरक्या, हरकती आणि त्यांना साथ देणारा तबला अन् सारंगी हे सारे आजही द.भि.सरांसाठी तितकेच ताजे आहे. त्यांचे पणजोबा म्हणजे आईचे आजोबा बाळकृष्णनाथ राजूरकर ग्वाल्हेरच्या राजदरबारचे गायक. संगीताचा हा वारसा आईच्या माहेराकडून द.भि.सरांना मिळाला. अगदी लहान वयातच संगीताने त्यांना झपाटून टाकले. इतके, की एखादा कार्यक्रम ऐकून आल्यानंतर पुढचे तीन-चार दिवस कुलकर्ण्यांच्या घरातला लहानगा दत्तात्रय घरात असून नसल्यासारखाच वाटायचा. संगीताचे हे पछाडणे हळूहळू लक्षात येऊ लागले आणि आपण या क्षेत्राच्या वाटेला गेलो तर बाकी सगळेच सोडून द्यावे लागणार; नव्हे ते आपोआप सुटणारच की! सगळ्या जबाबदाऱ्यांपासून आपण दूर जाणार ही जाणीव झाली. संगीतकलेबद्दल जितके प्रेम वाटले तितकेच तिचे भय वाटत असल्यामुळे तिच्यापासून वेळीच चार पावले दूर राहण्याचा निर्णय झाला. द.भि.सरांच्या मनात संगीत कलेबद्दल आजही तितकाच आदर आणि प्रेम आहे; पण या दोघांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पुस्तकांचा एक आडोसा तयार झाला आहे. 'मी ग्रंथातून जन्माला आलो' असे म्हणणाऱ्या द.भि. सरांना आजही ग्रंथांची बहुमोल सोबत लाभत आहे.

नागपुरात १९९७ साली मंगेशकर वाग्विलासिनी पुरस्कार प्रदान सोहळा झाला. त्यावेळी गानसविता गंगुबाई हनगल, ज्येष्ठ अभिनेते दिलीप कुमार आणि पहिल्या महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी यांच्यासह द.भि.सरांचाही या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या पुरस्काराच्या निमित्ताने साक्षात गंगुबाई हनगल यांच्याबरोबर काही काळ गप्पा गोष्टी करता आल्या याचा द.भि.सरांना झालेला आनंद पुरस्काराइतकाच मोठा होता. संगीत आणि साहित्याबरोबरच ज्योतिषशास्त्र हा द.भि. सरांचा अभ्यासाचा आणि आवडीचा विषय आहे. आपले आवडते कवी बा.सी.मर्ढेकरांच्या साहित्यात खोलखोल शिरणारे द.भि. सर आणि अनेक व्यक्तींच्या जन्मपत्रिकांचा रात्र रात्र अभ्यास करणारे द.भि.सर पाहिले की त्यांच्या व्यक्तिमत्त्वातल्या वेगळ्या रसायनाची जाणीव निश्चितच होते.

समीक्षक आणि द.भि.सर हे समीकरण आज एकरूप झाले असले तरी एक वाचक म्हणून समीक्षा हा प्रकार त्यांना फारसा आवडत नाही. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात अनेक पुस्तके त्यांच्या वाचनात आली. मराठीच नाही तर हिंदी, इंग्रजी साहित्याचाही त्यांनी व्यासंग ठेवला आणि या साऱ्यातून एक समीक्षक जन्माला आला. दुसऱ्यांचे न पटणारे लेखन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. प्रेमभंग झाल्याने एखादी व्यक्ती कविता लिहायला लागते तसे, 'अभिरुचीभंग झाल्यामुळे मी समीक्षा


करायला लागलो' असे ते आवर्जून सांगतात.

परखडपणे लिहिणारे आणि स्पष्टपणे बोलणारे एक ज्येष्ठ समीक्षक म्हणून साहित्यक्षेत्रात द.भि.सरांचा चांगलाच दबदबा. विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या समीक्षेचा रसिकवर्गही मोठा. आपल्या समीक्षेबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन, उद्देश आणि त्याची तत्त्वे आजही तितकीच लख्ख आहेत. 'समीक्षा हे एक प्रकारचे सृजनच असते. समीक्षा ही स्वत: कलाकृती होत नाही पण तिच्या खतपाण्यातून एखाद्या कलाकृतीला नवीन धुमारे निश्चित फुटतात. कलाकृतीचे हनन किंवा जनन करणे हेच समीक्षेचे कार्य असते' अशी समीक्षेची त्यांची स्पष्ट व्याख्या. एक रसिक समीक्षक अशी त्यांची ओळख होणे स्वाभाविकच आहे.

मराठी साहित्य क्षेत्राला अभ्यासपूर्ण ३७ पुस्तकांचे योगदान देणारे आणि सुमारे चाळीस वर्षे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर निवृत्त आयुष्य न जगता आपल्याला आनंद देणाऱ्या लेखन आणि वाचनात द.भि.सरांनी स्वत:ला झोकून दिले आहे. आज वयाच्या ७६ वर्षी मागे वळून पाहताना आपल्या आयुष्याच्या दृष्टिकोनाबद्दल द.भि.सर समाधानी आहेत. स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य तर आहेच पण मानवालाच लाभलेले ते एक खास वैशिष्ट्य आहे, हा त्यांच्या जगण्याचा मूलमंत्र. मात्र 'एक समीक्षक म्हणून आपण आजही असमाधानी आहोत कारण दिशाभूल झालेल्या मराठी साहित्याला योग्य वाट दाखवण्यात आपण यशस्वी झालो नाही,' अशी खंत द.भि.सर व्यक्त करतात. त्यासाठीचा प्रयत्न लेखनाच्या माध्यमातून आपण शेवटपर्यंत करणार असल्याची ग्वाहीसुद्धा देतात. पत्नी शिवरंजनी यांच्या जाण्याने आज आलेल्या काहीशा एकटेपणाला ते धीराने सामोरे जात आहेत. आई सरस्वती आणि थोरली बहीण शरूताई या दोन स्त्रियांच्या संस्कारांनी, पुस्तकांच्या सहवासाने आणि संगीतकलेच्या प्रचितीने हा जन्म सुखकर आणि आनंददायी तर झालाच आहे. पण या सगळ्यासाठी एक जन्म पुरेसा ठरणारा नाही म्हणून वाचक, लेखक, शिक्षक आणि रसिक म्हणून आणखी बरीच जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढचे सात जन्म आपल्याला मिळावेत, ही द.भि.सरांची इच्छा पूर्ण होवो, हीच यानिमित्त त्यांना शुभेच्छा!

**– ममता क्षेमकल्याणी**

vidisha_mn@yahoo.co.in




**सोन्याच्या धुराचे ठसके**

पावशतकी सौदी अनुभव

**डॉ. उज्ज्वला दळवी**

सौदी अरेबियासारख्या अत्यंत प्रतिकूल हवामानाच्या, कट्टर इस्लामी राज्यात उपेक्षा, अन्याय नि हालअपेष्टा सहन करत, आयुष्यातील उमेदीची पंचवीस वर्षे वास्तव्य करणाऱ्या डॉ. उज्ज्वला दळवी यांनी त्या देशाच्या अंतरंगात शिरून, ते उकलून आपल्यापुढे ठेवले आहे. आपण वाचकांनी त्याबद्दल त्यांचं कृतज्ञ असायला हवं.

**मीना प्रभू**

**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय भाषणे

*एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाची एक फार मोठी लाट महाराष्ट्रात निर्माण झाली. प्रबोधनाचे काम करणाऱ्या संस्थांनी निर्माण केलेल्या अनेक परंपरा काळाच्या ओघात निस्तेज होऊन नाहीशा झाल्या. त्याला अपवाद साहित्य संमेलनांचा!*


*पुण्यात १८७८ मध्ये ग्रंथकारांचे पहिले संमेलन झाले. मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचे संमेलन तालुका पातळीवर आजही होते. अशी सुमारे शंभर संमेलने महाराष्ट्रात दरसाल होतात. गेल्या वर्षीपासून परदेशातही साहित्य संमेलन होऊ लागले आहे.*

*साहित्य संमेलन म्हटले की संमेलनाध्यक्ष कोण याबाबत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संलग्न संस्था कार्यरत होतात. अध्यक्षांची निवड बिनविरोध व्हावी असे दरवर्षी सांगितले जाते. पण निवडणूक होतेच. संमेलनाध्यक्षांनी आपल्या भाषणातून नवीन विचार द्यावा, भाषा- साहित्य याबद्दल आपले विचार मांडावे, अशी अपेक्षा असते.*

*'लेखण्या मोडा व बंदुका हाती घ्या' असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या भाषणात सांगितले. माधव ज्युलियन यांनी भाषाशुद्धीचे महत्त्व आपल्या भाषणात स्पष्ट केले. अलिकडे अरुण साधू यांनी आपल्या भाषणात 'कादंबरी' या साहित्यप्रकारावर विचार मांडले. यावर साहित्य जगतात जशी चर्चा होणे आवश्यक होते, तशी मात्र झाली नाही.*

*यावर्षी पुण्यात होणाऱ्या संमेलनाचे उद्‌घाटक आहेत विंदा करंदीकर, तर अध्यक्ष आहेत समीक्षक द.भि. कुलकर्णी. आजच्या तरुण पिढीला ही नावे ठाऊक असण्याची फारशी शक्यता दिसत नाही. त्यामुळे अमिताभ बच्चन व सचिन तेंडुलकर यांना संमेलनात उपस्थित राहण्याची विनंती आयोजकांनी केली आहे.*

*काही निवडक संमेलनाध्यक्षांच्या भाषणातील भाषा व साहित्य याबद्दलचे पुढील उतारे वाचताना असे जाणवेल की गेल्या शंभर वर्षांत आपल्या भाषेबद्दल वा साहित्याबद्दल काही प्रश्न जसेच्या तसेच आहेत. उदा. मराठी विद्यापीठ, मातृभाषेतून शिक्षण, साहित्याचा खालावलेला दर्जा अथवा भाषा शुद्धी चळवळ.*



**माधवराव विनायकराव किबे**

सध्या मराठी भाषेत जी बजबजपुरी माजली आहे तिला आळा घालणे जरुरीचे आहे. लोकांच्या वाचनभिरुचीस अनिष्ट असे वळण लागत आहे; बुद्धिमत्तेचा अपव्यय होत आहे. उच्च प्रतीच्या ग्रंथकारांना वाव मिळेनासा झाला आहे. अर्थात् ही स्थिती चालू राहू देणे कोणासही इष्ट वाटणार नाही. आमच्या समजुतीने याचे मुख्य कारण असे आहे की, ''मासिक किंवा एखादे वर्तमानपत्र चालविणे हे एक अलिकडे चरितार्थाचे सन्मान्य साधन होऊन बसले आहे; आणि म्हणूनच त्यांना इतका भर आला आहे. बरे, एखादे मासिक एकदा काढले म्हणजे ते चाललेच पाहिजे म्हणून त्याच्या बोचणीने कसे तरी मारूनमुटकून लेखकही तयार करणे भाग पडते. याप्रमाणे नियतकालिकांचे चालक व लेखक यांच्यामध्ये एकतऱ्हेचा सिद्धसाधकांचा लपंडाव चाललेला असतो असे म्हणावयास हरकत नाही. लेखक म्हणविणारे लौकिक साधून घेतात व मासिकांचे चालक चरितार्थाचा लाभ करून घेतात. सध्या चालू असलेल्या शेकडो नियतकालिकांच्या चालकांपैकी बरेचसे लोक इतके अशिक्षित व कोत्या बुद्धीचे आहेत की त्यांच्या (मठ्ठ) डोक्यांतून प्रसवणाऱ्या उपहासास्पद कल्पना बहुजनसमाजाची अभिरुची बिघडविण्यास कारणीभूत होऊ लागल्या आहेत,'' हे जे उद्‌गार काही वर्षांपूर्वी एक लेखकाने काढले होते ते आजही बहुतांशी यथार्थच आहेत.

**(मुंबई, १९२६)**


श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या गीतेवरील भावार्थदीपिकेपासून ते लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यापर्यंत ज्या मराठीमध्ये आतापर्यंत अनेक ओजस्वी ग्रंथ निर्माण झाले आहेत, ती भाषा मरण्याकरिता जन्माला आलेली नाही! ज्या भाषेत रामदासांनी शिवाजीला स्वधर्मरक्षणाची प्रेरणा केली, आणि ज्या भाषेमध्ये शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वराज्य आणि स्वातंत्र्य प्रस्थापित केले, ती मराठ्यांची भाषा मारण्याकरिता जन्माला आलेली आहे, मरण्याकरिता नव्हे!

ज्या भाषेत बाजीराव बल्लाळ लढले, ज्या भाषेत राघोबादादांनी अटकेपर्यंत भराऱ्या मारल्या, ज्या भाषेत नाना फडणविसांनी मनसुबे केले, ज्या भाषेत महादजी शिंद्यांनी दिल्लीमध्ये फिरून मराठ्यांचे नाव कायम केले, आणि ज्या भाषेमध्ये झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनी आपली स्वदेशभक्ती आणि वीरवृत्ती ओतली, ती मराठी भाषा नष्ट होणे केव्हाही शक्य नाही!

**(बेळगाव, १९२९)**



**शिवराम महादेव परांजपे**



**नारायण गोविंद चापेकर**

वाङ्मय ही समाजाची नाडी आहे. कोणत्याही समाजाच्या वाङ्मयीन स्वरूपावरून तो समाज संस्कृतीच्या कोणत्या पायरीवर आहे हे समजते. ह्या वाङ्मयावरून सरकार, लोक व विद्यापीठ ह्या तीनही संस्था परीक्षिल्या जातात. वाङ्मयाच्या बऱ्यावाईटपणाची जबाबदारी तीनही संस्थांवर सारखीच आहे. म्हणून आजच्यासारख्या वाङ्मयविषयक कार्यात लोकांप्रमाणे विद्यापीठाने व सरकारनेही लक्ष घातले पाहिजे. परंतु आमच्या संमेलनाची वार्ताही दोघांस नसते. सरकार व विद्यापीठ ह्यांच्या सहकार्याच्या अभावी देशी भाषांतील वाङ्मयाला ठेचा खात खात आपला मार्ग आक्रमण करावा लागत आहे. असे असूनही मराठी भाषेचे पाऊल झपाट्याने व नेटाने पुढे पडत आहे हे पाहून आनंद होतो.


काही बाबतीत आपले पाऊल पुढे पडत असले तरी अद्यापि अनाक्रांत प्रांत फार आहे हे विसरून चालणार नाही. नृत्यकला, संगीत, भारतीय खेळ, देवेतिहास, चालीरीती इत्यादी अनेक विषयांना आपण अद्यापि हात लावला नाही. श्रीमंत बाळासाहेब पंत, रा.ब. धुरंधर असे धुरंधर चित्रकार आपल्यात असूनही चित्रकलेवर मराठीत ग्रंथ नसावा ही खेदाची गोष्ट होय. श्रीमंत बाळासाहेब पंत ह्यांचे 'अजंठाची लेणी' हे पुस्तक मराठीत झाल्यामुळे वरील उणीव अंशत: भरून निघाली आहे. त्यांच्या 'आर्यांची चित्रकला' व दाभाड्यांचा 'भारतीय चित्रकला' हे दोन निबंध वाढवून त्यांची परिणती मोठ्या ग्रंथांत करता येण्यासारखी आहे. महाराष्ट्रात अलिखित वाङ्मय विपुल आहे. त्याच्याकडेही आमची दृष्टी अद्यापि वळली नाही. कहाण्या, मंत्र, कथा, लावण्या ह्यांचा भाषेच्या व इतिहासाच्या दृष्टीने विचार व्हावयास पाहिजे. ह्या बाबतींत त्यांचे महत्त्व फार आहे ह्याची जाणीव अजून उत्पन्न झालेली दिसत नाही.

**(बडोदा, १९३४)**


'विद्या ददाति विनयम्' असे संस्कृतात एक सुभाषित आहे. 'विनय' म्हणजे नम्रता नव्हे, विनय म्हणजे विशेष मार्गाने नेणे. जिच्या अध्ययनाच्या योगाने, देश, काल, वर्तमान परिस्थिती, राजवट इत्यादिकांचा विचार करून, आपल्याला, आपल्या समाजाला व आपल्या राष्ट्राला विशेष मार्गाने नेऊन त्यांची सर्व बाजूंची उन्नती करता येते, अशी कर्तबगारी जिच्या अभ्यासाने करता येते, ती 'विद्या'.

असल्या विद्येचे अध्ययन आज होत नाही, असे खेदाने म्हणावे लागते. चारपाच बुके मराठी-इंग्रजी शिकलेला, घरी दहापाच बिघे उत्तम शेती असलेला, पट्टेवाल्याची -ताबेदारीची नोकरी पत्करतो. त्याला शेतकरी होऊन घरचे शेत कसायची हिंमत राहत नाही. असली शरीर व मन दुबळे करून टाकणारी विद्या कसली? पण हा हल्लींच्या विद्येचा परिणाम!

**(इंदूर, १९३५)**



**भवानराव पंतप्रतिनिधी**




**माधव त्र्यंबक पटवर्धन**

आज सुशिक्षित लोक मराठी भाषेचा तिरस्कार करीत आहेत असे मला वाटत नाही. त्यांना तिचा मुळीच अभिमान नसेल असेही म्हणता येत नाही. परंतु मूलगामी अभिमानाच्या अभावी अद्यापि तिची उपेक्षा होत आहे यात तिळमात्र संदेह नाही. विद्यापीठाच्या परीक्षांना मराठी हा विषय केवळ आवश्यक केल्याने ही स्थिती सुधारेल, असे विष्णुशास्त्र्यांसही वाटले नाही आणि मलाही वाटत नाही. हा उपाय कृत्रिम आहे म्हणून याला यश येत नाही अशी स्थिती नसून, मराठीचे विद्यार्थी नि सूत्रधार यांना मराठीचा खरा अभिमान नाही, हे खरे अपयशाचे कारण आहे.

'भाषाशुद्धि' हा शब्द वापरला की, काही लोकांना आता सोवळेओवळे माजणार अशी भीती वाटते. त्यांना ज्या सोवळ्याओवळ्याची चिंता वाटते ते आमच्याजवळ नाही. मराठी भाषेला आम्हाला 'सोवळी' करावयाची नाही, असे आश्वासन आम्ही देतो. परंतु ती 'अखंडसौभाग्यवती' झालेलीही आम्हांला पाहवणार नाही!

**(जळगाव, १९३६)**


मराठी शिक्षण हा आपल्या मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. आमच्या शिक्षणांत मराठी शिक्षणाचा पाया उत्कृष्ट व भक्कम घातला गेला पाहिजे. सांप्रत मराठी शिक्षणाची दुरवस्था आहे. सरकार व विद्यापीठ दोहोंचे याकडे दुर्लक्षच आहे. साऱ्यांना इंग्रजीची काळजी! माझ्या मते हिंदुस्थानात आपणांस बहुभाषिक झाले पाहिजे. पण सर्वांत प्रधान स्थान जन्मभाषेचे! तो पाया कच्चा ठेवून कोणचीच इतर भाषा शिकली व शिकवली जातां कामा नये! तेव्हा महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या संस्थेने मराठी शिक्षणाची एकंदर व्यवस्था सर्व प्रकारच्या शाळांतून कशी आहे, नेमलेली मराठी अभ्यासपुस्तके कशी आहेत, मराठीचे शिक्षक सुपात्र आहेत किंवा नाहीत, इतर वाचनासाठी भरपूर ग्रंथसंग्रह शाळांत आहे किंवा नाही, मराठी लेखन-वाचन-भाषणाचे शिक्षण कितपत व कसे चालते, शुद्धलेखनावर कटाक्ष आहे किंवा कसे, मराठीचे योग्य स्थान अभ्यासक्रमांत तिला दिले आहे किंवा नाही, मराठीत कच्चे असलेले विद्यार्थी वर चढविले जातात किंवा काय इत्यादी प्रश्नांची कसून चौकशी करण्याची खटपट करावी.



**दत्तो वामन पोतदार**

आपल्या सर्व संस्थांचे व्यवहार मराठीत चालले पाहिजेत. यासाठीही लोकांस चोदना केली पाहिजे! सांप्रत पुण्यासारख्या मराठीच्या माहेरघरी रस्त्यांतून सहज हिंडले तरी जिकडे तिकडे, फर्म्स-स्टोअर्स-डिलर्स-आणि मर्चंट्स दिसतात. तो लज्जास्पद देखावाच मोडून काढला पाहिजे. प्रत्येक व्यक्तिपावेतो हे मराठीच्या अभिमानाचे लोण पोचविले पाहिजे. मराठीची सुस्थिति, ग्रंथांची विक्री, ग्रंथकारांची स्थिती या सर्वांविषयी जागरूकपणे शोध ठेविला पाहिजे. दोष सुधारून, दु:खे निवारुन मराठीची सर्व अंगांनी प्रगति कशी होईल, तिचे सामर्थ्य कसे वाढेल याची अहोरात्र चाळणा केली पाहिजे. आज मराठी ग्रंथांची संख्या वीस हजारांवर नाही. जगातल्या प्रगत भाषांतील ग्रंथसंख्या लाखांनी मोजावी लागते. तो भाग्याचा दिवस मराठीला कसा येईल, निदान येत्या दहा वर्षांत विसाचे तीस हजार तरी करता येतील काय, हे असे विचार चालले पाहिजेत. व्यर्थ उखाळ्यापाखाळ्या व वाद करण्यापेक्षां आमचे वर्तमानपत्रकार जर या विषयाकडे लक्ष पुरवतील, वारंवार यासंबंधाने लिहितील, जागृति व मार्गदर्शन करतील तर फार मोठी क्रांति घडून येईल.


**(अहमदनगर, १९३९)**



**नारायण सीताराम फडके**

आजच्या वृत्तपत्रीय साहित्यांत संघटनात्मक धोरणाचा व सात्त्विक शक्तीचा अभाव स्पष्ट दिसतो. 'केसरी' व 'काळ' पत्रांची तीस वर्षांपूर्वीची परंपरा सर्वस्वी नाहीशी झालेली दिसते. त्यावेळी 'राजा बोले दळ हाले' या न्यायाने 'केसरी'ने लिहावे आणि दोन कोटी मराठी लोकांनी त्याप्रमाणे आचरण करावे अशी स्थिती होती. टिळकांच्या अग्रलेखाच्या संग्रहाला चिरकाल टिकणाऱ्या मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळालेले आहे. आजच्या कोणत्या वृत्तपत्रातले अग्रलेख असे स्थान मिळवू शकतील? लोकमत बनविण्याची प्रचंड शक्ति आजच्या कोणत्या वर्तमानपत्रांत आहे? आज वर्तमानपत्रे डझनावारी आहेत. पण, टिळकांचा 'केसरी' संपल्यावर-'केसरी' नव्हे, टिळकांचा 'केसरी' असे मी म्हणतो आहे, तो संपल्यावर-तोफ गेली आणि दिवाळीत टिकल्या उडविणाऱ्या खेळण्यातल्या खोट्या पिस्तुलांचे फुसके आवाज तेवढे आज ऐकू येत आहेत!

**(रत्नागिरी, १९४०)**



**प्रल्हाद केशव अत्रे**

मराठी साहित्याचा हा सारा विस्तार नि:स्वार्थी लेखकांच्या दारिद्र्यावर, निष्ठेवर आणि त्यागावर उभारलेला आहे. अद्यापही साहित्य हा महाराष्ट्रांत साहित्यिकांचा उपजीविकेचा धंदा झालेला नसून तो त्यांच्या हौसेचाच व्यवसाय आहे. लेखन हा मराठी लेखकांचा जोडधंदा आहे. आजपर्यंत निर्माण झालेले सारे मराठी वाङ्मय हे केवळ ह्या जोडधंदेवाल्यांच्या उद्योगाचे फळ आहे हे लक्षात आणले, म्हणजे आश्चर्याने मन थक्क होते. अर्थातच ही परिस्थिती काही चांगली नाही. साहित्यलेखन हा महाराष्ट्रांतल्या बुद्धिमान माणसांचा एकमेव व्यवसाय झाला तरच मराठी भाषेचे आणि साहित्याचे त्यांत कल्याण आहे. ह्याचा अर्थ असा की लेखनावर साहित्यिकांची योग्य तऱ्हेने उपजीविका व्हावयाला पाहिजे. वाचनासाठी वाचकांनी पैसे खर्च करावयाला उत्सुक असले पाहिजे. 'फुकट लिहावे आणि फुकट वाचावे' ही परिस्थिती वाङ्मयाच्या सरधोपट प्रसाराला उपकारक असली तरी जोमदार वाढीला मुळीच पोषक नाही. दोन कोटी लोकांच्या ह्या राष्ट्रांत लोकप्रिय पुस्तकाच्या दोन हजार प्रति देखील एका वर्षात खपू शकत नाहीत ही दु:खाची गोष्ट आहे. लोक शिक्षणासाठी जसा पैसा खर्च करतात, तसा त्यांनी साहित्यासाठी पैसा खर्च केला पाहिजे. गृहाच्या शोभेसाठी गृहिणीइतकीच ग्रंथांचीही आवश्यकता आहे हे तत्त्व जनतेच्या मनावर बिंबले पाहिजे.

**(नाशिक, १९४२)**

# मौन होई बोलके – पुस्तक प्रकाशन समारंभ वृत्तांत

रोहिणी लिमये लिखित 'मौन होई बोलके' या पुस्तकाचे प्रकाशन ग्रंथालीतर्फे १२ फेब्रुवारी २०१० रोजी झाले. या सोहळ्याला डॉ. राजीव दळवी, डॉ. गौरी मंकीकर, उषा मेहता, पॅराप्लेजिक फाउंडेशनच्या संस्थापक सुलभा वर्दे आणि महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या अध्यक्ष, लेखिका नीला सत्यनारायण आदी मान्यवर उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन नीला सत्यनारायण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक गोखले यांनी केले. तसेच वक्त्यांचे विचार कर्णबधीर विद्यार्थ्यांना समजावे म्हणून केतकी देशपांडे त्यांना खाणाखुणांच्या भाषेत दाखवत होत्या.

उषा मेहता यांनी ग्रंथालीच्या वतीने पुस्तकाची पार्श्वभूमी सांगितली. त्या म्हणाल्या, ''मौनाला बोलके करणारे हे पुस्तक आहे. समाजात वेगवेगळ्या क्षेत्रांत अनेक व्यक्ती ध्यास घेतात व कार्य करतात रोहिणीताई त्यामधीलच एक आहेत. हे काम करत असताना नफा-तोटा या गोष्टींचा विचारही त्यांनी केला नाही. रोहिणीताईंनी कर्णबधीर मुलांना बरोबर घेऊन काम केले. ग्रंथालीने हे कार्य समाजापर्यंत पोचवण्याचे ठरवले आणि हे पुस्तक सिद्ध झाले.''

रोहिणीताईंनी मनोगत व्यक्त करताना अनेक वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. अनेक अनुभव सांगितले. त्या म्हणाल्या की, ग्रंथालीने प्रेरणा दिल्यामुळे मौनांना बोलके करता आले. त्यांची पहिली विद्यार्थिनी ज्योती. १९६९ साली तिच्या अपघाती निधनामुळे सर्वांना खूप मोठा धक्का बसला. ज्योतीच्या आई-वडिलांमुळे हे कार्य उभे करण्याची प्रेरणा लाभली. असंख्य मुलांना शिकण्याची ज्योत ज्योतीने लावली असे रोहिणीताईंनी आवर्जून सांगितले. या सर्व मुलांना स्वत:च्या पायावर उभे करायचे व त्यांना समाजात वावरण्यास तयार करायचे; या मुलांना काय वाटते याचा विचार करायचा व त्या दृष्टीने पाऊल टाकायचे असे त्यांनी ठरवले. या प्रक्रियेत पालकांचे मार्गदर्शन हा महत्त्वाचा भाग आहे. कारण अनेक ठिकाणी कर्णबधीर मूल जन्माला आले की त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. परंतु पालकांनी त्याच्यासोबत सतत संवाद साधला, तर त्याचा मुलांना फायदा होईल. त्यांची खाणाखुणांची भाषा ही मुलांची मातृभाषा असल्याने ती त्यांच्यापासून हिरावून घेऊ नका असेही रोहिणीताई म्हणाल्या.

डॉ. दळवी म्हणाले की, ''रोहिणीताईंचे हे कार्य दीपस्तंभाप्रमाणे आहे. त्यांनी लिहिलेले पुस्तक बहुमोल आहे. मी स्वत: स्पेशालिस्ट असलो तरी खऱ्या अर्थाने रोहिणीताई आमच्या आदर्श आहेत. त्यांनी मुलांच्या पुनर्वसनाचे काम केले आहे. हे पुस्तक म्हणजे पालक व विद्यार्थ्यांमधील दुवा आहे. ग्रंथालीने एक महत्त्वाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.''

सुलभा वर्दे यांनी आपल्या भावना मोजक्या शब्दांत सांगितल्या, ''कर्णबधीर मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी संवाद हा महत्त्वाचा घटक असतो. रोहिणीताईंनी त्याचा अभ्यास करून अशा मुलांशी मायेने संवाद साधला व त्यांच्या विकासासाठी विविध पद्धती निर्माण केल्या. हे त्यांचे काम कौतुकास्पद आहे.''

''विविध क्षेत्रात अतुलनीय काम करणाऱ्या स्त्रियांची दखल शासन घेत नाही व समाजही घेत नाही. प्रत्येक गोष्टींसाठी शासनावर अवलंबून राहण्यापेक्षा समाजाने अपंगासाठी कल्याणकारी योजना आखल्या पाहिजेत. कर्णबधीर मुले जन्माला आली की पालक त्यांच्याशी बोलणे टाळतात. परंतु अशा मुलांचा मेंदू काम करीत असतो, याची पालकांनी जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अशा पालकांसाठी हे पुस्तक संदर्भग्रंथ ठरेल'', असे नीला सत्यनारायण यांनी सांगितले.

**– नीलम गडाख, मुंबई**


## 'रुची' संबंधीचे प्रकटन

संपादक, मुद्रक, प्रकाशक
**दिनकर गांगल**

राष्ट्रीयत्व-भारतीय
मालकी : ग्रंथाली विश्वस्त संस्था
पत्ता : इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३
प्रसिद्धीचा नियतकाल
दर महिन्याला, १० तारीख

**प्रकाशन स्थळ**
इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०२८
दूरध्वनी : २४४७ ४८ ४३


# ‘कऱ्हाड : प्रीतिसंगमावरचे आदितीर्थ’ पुस्तकाचे प्रकाशन

ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या ‘कऱ्हाड : प्रीतिसंगमावरचं आदितीर्थ’ या विजय शं. माळी लिखित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ नुकताच कऱ्हाड येथील वेणुताई चव्हाण सभागृहात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार (कोल्हापूर) यांच्या हस्ते संपन्न झाला. कऱ्हाड जिमखाना, महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा कऱ्हाड व ग्रंथालीच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

महती आणि माहात्म, नाममहिमा, इतिहास, भूगोल, पर्यटकाच्या नजरेतून कऱ्हाड, पुरातन अवशेष, ऐतिहासिक वास्तू, प्रेक्षणीय स्थळे, अर्वाचीन कऱ्हाड, व्यापार, उद्योग, शेती, सहकार, शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, राजकरण, समाजकारण, लोकजीवन, लोकसंस्कृती इत्यादी अंगांनी कऱ्हाडचा सर्वांगी वेध, छायाचित्रांनी परिपूर्ण अशा या पुस्तकात घेण्यात आला आहे.

ज्या भूमीने घडवले, वाढवले, जिच्या अमृतपान्ह्यावर हा देह पोसला त्या मातीच्या ऋणातून काही अंशी का होईना उतराई होण्याची संधी यानिमित्ताने लाभली याबाबत समाधान व्यक्त करून लेखक विजय माळी यांनी ग्रंथाली व पुस्तक निर्मितीमागील ज्ञात-अज्ञात हातांचे आभार मानले.

औषधनिर्माण शास्त्राचे शिक्षण घेतलेल्या, कथा, कविता, ललित गद्य, स्फुट, वैचारिक चिंतनपर आणि आता स्थानिक इतिहास अशा विविध वाङ्मय, प्रकारांमधून मोजके पण दर्जेदार लेखन करणाऱ्या माळींचे विशेष कौतुक करून व्यासंगी साहित्य अभ्यासक आनंद वि. पाटील यांनी रसिक वाचक म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना माळींच्या प्रकाशित सर्व पुस्तकांचा रसपूर्ण आढावा घेतला व अत्यंत मौल्यवान संदर्भांनी युक्त, छायाचित्रांनी परिपूर्ण, संदर्भमूल्य असलेले कऱ्हाडवरील हे पुस्तक प्रत्येक सुजाण रसिकाच्या संग्रही असायला हवे. असे प्रतिपादन करून पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल लेखक व ग्रंथालीला धन्यवाद दिले.




पुस्तक प्रकाशनानंतर डॉ. पवार यांनी आपल्या विचारगर्भ भाषणातून स्थानीय इतिहासाचे पुढच्या पिढीच्या दृष्टीने असलेले महत्त्व विषद केले. ते म्हणाले,‘‘भारतीय लोक आपली संस्कृती सर्वश्रेष्ठ समजत असले तरी ही गोष्ट अर्धसत्यच आहे. खरे तर, आपणच जगात सांस्कृतिक दृष्ट्या सर्वाधिक मागासलेले लोक आहोत, कारण आपल्याला आपला संपूर्ण इतिहासच ठाऊक नाही. इतिहास घडवण्याइतके इतिहास लिहिणे महत्त्वाचे आहे.’’ लेखकाला धन्यवाद देऊन ते म्हणाले,‘‘इतिहास जतन करणे राष्ट्रभक्तीचे काम आहे. माणूस हा इतिहास जगत असतो. इतिहासाच्या खांद्यावर बसून जीवनाचा प्रवास आपण करत असतो. अशा प्रकारचे लेखन होणे गरजेचे आहे.’’ पुस्तकातील संदर्भ देत पाहुण्यांनी कऱ्हाडचा इतिहास उलगडून दाखवला.

सूत्रबद्ध, देखणा नि शानदार अशा या प्रकाशन सोहळ्यात डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्र व शालेय विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेषात, पालखीतून, दिंडीच्या रूपात मुख्य प्रवेशद्वारातून ग्रंथ व्यासपीठावर आणला. यातून निर्माण झालेल्या भावपूर्ण वातावरणामुळे व्यासपीठावरील मान्यवरांसह, संपूर्ण प्रेक्षागारातील रसिकांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले.

पुस्तक प्रकाशन सोहळ्यादरम्यान, व्यासपीठावरील स्क्रीनवर होणारे पुस्तकाच्या अंतरंगाचे, विविध छायाचित्रांचे प्रक्षेपण हेही सोहळ्याचे एक आकर्षण ठरले. सोहळ्यास रसिक बहुसंख्येने उपस्थित होते.

कऱ्हाड जिमखान्याचे अनिल कुलकर्णी यांनी स्वागत, ईश्वरी खुपिरेकर हिने सरस्वतीस्तवन तर म.सा.प. शाखा कऱ्हाडचे अध्यक्ष महेंद्रकुमार शहा यांनी प्रास्ताविक केले. राजेश पाटील यांनी लेखक परिचय आणि संजय पुजारी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**– प्रतिनिधी**
कऱ्हाड जिमखाना,
म.सा.प. शाखा, कऱ्हाड.

# ‘वाडा’ संस्कृती

## अनुराधा गांगल

पुणे हे अनेक कारणांनी प्रसिद्ध शहर आहे. पुण्याची हवा सुंदर, पुणे म्हणजे विद्येचे माहेरघर, पुण्याचा शनिवार वाडा, पुण्याची पर्वती, पुण्याचा लालमहाल, पुण्याची सारसबाग म्हणजेच पूर्वीचा तळ्यातला गणपती, पुण्याचा लक्ष्मीरोड, पुण्याची मंडई, पुण्याचे पेशवे उद्यान, संभाजी उद्यान, पुण्यातील मंडळी व त्यांची महत्त्वाचे करून गाऱ्हाणी, पुण्याची उच्चारवाणी, पुण्याची तुळशीबाग अन् पुणे येथील ‘वाडा’ संस्कृती. माझी आजी व आई करायच्या या सर्वांची वर्णने. आम्ही वाढलो ते पुणे अन् आता पाहतो ती पुण्यनगरी यांच्यात जमीन-अस्मानाइतका फरक आहे. तुळशीबाग म्हणजे तीमध्ये सर्वत्र असणारी तुळशीची रोपे. रामाला रामजन्मदिनी ‘दवणा’ वाहणे, मंडईतील खरेदी, पर्वतीला श्रावणी सोमवारी जायचे तर बरोबर कोणी मोठे आहे का नाही याची काळजी. तळ्यातील गणपतीला जाणे अन् भोवतालच्या हिरवळीवर आवळीभोजनासारखा मनमुराद आनंद घेणे ही मजा काही वेगळीच होती.

पद्मावती व अरण्येश्वर ही पुण्यातली महत्त्वाची देवस्थाने. तिथे वर्षांतून एकदा तरी वाड्यातील सर्व मंडळी मिळून सहलीला जात. ती खरोखरच मस्त सहल असायची. ‘अंबिल’ ओढ्यातून ओला हरभरा किंवा उसाचे करवे खात खात गाण्याच्या भेंड्या लावत पद्मावती-अरण्येश्वरला जाणे म्हणजे मज्जाच! आता ही मंदिरे आजूबाजूच्या इमारतीच्या जंगलात कुठेतरी हरवली आहेत.

विठ्ठलवाडी, शिंद्यांची छत्री, देहू-आळंदी-चिंचवड अशा ठिकाणी शाळेतून आमच्या सहली निघत. विश्रामबाग वाडा, डेक्कन जिमखाना ह्या भागांचेही पूर्वी अप्रूप वाटत असे. आता विश्रामबागेच्या भोवतालचा भाग ‘चितळेमय’ झाला आहे. शनिपार-पेरूगेट-पाताळेश्वर-चतु:शृंगी ही स्थाने आजही मनात ठसून आहेत. या सगळ्या गोष्टींप्रमाणे पुण्याचे महत्त्वाचे संस्कृतिस्थान म्हणजे पुण्यातील ‘वाडे’.

आता सर्वत्र ‘अर्पाटमेंट’ संस्कृती दिसते, तिथे पूर्वी पुण्यात ‘वाडा स्थान’ होते. याच पुण्याच्या वाड्याने आम्हाला खूप खूप दिले आहे. प्रत्येक गोष्टीत फायदे-तोटे असतीलही, पण वाड्याने आम्हाला ‘एकीचे बळ’ दिले. सार्वजनिक मोठ्या कुटुंबाची व्याख्या समजावली; इतकेच काय तसेच वाढण्याची सवय जडवली. मिळूनमिसळून राहयचे, सर्वत्र एकत्र जायचे, लुटुपुटूची भांडणे झाली तरी परत एक व्हायचे, अंगत-पंगत करायची, मंगळागौरी जागवायच्या, भोंडले खेळायचे, लग्नाच्या निवड-टिपणापासून लग्नात आलेला ‘आहेर’ पाहण्यासाठीही एकत्र यायचे, श्रावणात प्रत्येक सोमवारी वेगवेगळ्या शंकराला एकत्र जायचे. अशा अनेक गोष्टी ‘वाड्याने’ आम्हाला दिल्या.

माझी आजी अन् आई-वडील वाड्यात राहयला आले त्याला झाली असतील ऐंशी-नव्वद वर्षे. आई सांगे, वाड्यात बिऱ्हाडे होती वीस/बावीस. दररोजचा प्रत्येकाचा स्वयंपाक वेगळा असला तरी बाकी अनेक गोष्टी एकत्रित असत. लग्नकार्य किंवा देवादिकांचा मोठा उत्सव असेल तर सर्व घरांतील सर्व माणसे ज्या घरात लग्नकार्य असेल त्या घरी जेवायला असत. वाड्यातील सर्व बायका घरातील कामकाज भराभर आटोपून, त्या घरी सोवळे नेसून मदत करायला जात, वाढायला जात. तमाम पुरुषवर्ग सोवळे नेसून पाटावर जेवायला बसे. मोठ्या आवाजात ‘हर हर महादेव’ असा गजर झाला की जेवायला सुरुवात करीत. वाड्यातील जी मोठी मंडळी असत त्यांचा आदर एका वेगळ्याच पद्धतीने केला जाई. वाटीत उगाळलेल्या चंदनाचे चांदीच्या साखळीने प्रत्येकाच्या कपाळावर त्या कार्यक्रमाचे यजमान गंध लावीत असत. पूर्वी लग्नकार्यातून ‘कॉन्ट्रक्ट’ पद्धत नव्हती. पोत्या-पोत्याने धान्य घरी येई. ते अगदी निवड-टिपण्यापासून वाड्यातील घराघरातील स्त्रिया दुपारी न झोपता लग्नघरी कामासाठी जमत. आपलेच कार्य आहे ही भावना सर्व घरात असे.

मुले-मुली एकत्र खेळत, एकत्र नाटक-नाच-गाणी हे कार्यक्रम करीत. एकत्र भातुकली खेळत. भांडण झालेच तर कोणत्याही घरातील वडीलधारा माणूस तेथे असेल तर तो ते भांडण मिटवीत असे. ज्याचे चुकले असेल त्याला बोलतही असे. पण ‘तुम्ही कोण सांगणारे-बोलणारे?’ अशी वृत्ती नव्हती. एखादी मुलगी जोरात मोठ्याने हसली तर माझी आजी म्हणे, ‘‘काय गं, काय झालं इतकं फिदीफिदी हसायला! असं मुलींनी मोठ्यानं हसायचं नाही. जा संडासमध्ये जा अन् पिनेनं दात कोर. म्हणजे फिदीफिदी हसणार नाहीस. अगं, ‘हसू नये नारी, हसू कोण्या प्रकाराचं, सभेमध्ये नाव जातं भ्रताराचं’ (नवऱ्याचे).’’ आजच्या मुली म्हणतील, हसण्यासारखा विनोद झाला तर हसायला नको का? नवरा हसेल व मीही हसेन. त्यात काय मोठ्ठंस? अगदी बरोबर आहे. पण तो काळ, ती परिस्थिती, ती माणसे, ती वृत्ती, या त्या वेळच्या पाहण्याचा दृष्टिकोनात ती वागणूक बरोबर बसे.

आमच्या शेजारच्या घरात विमलाताई राहत होत्या. त्यांना मूलबाळ नव्हते. पूर्वी दिवाळी जवळ आली की घरे झाडणे, पितळी डबे चिंच लावून घासणे अशी घरे चकाचक करण्याची कामे काढण्यात येत असत. एकदा विमलाताई आईला म्हणाल्या, ''बरं बाई, तुम्हाला मुली हाताशी आहेत त्या. मला मेलं एकटीलाच सर्व करावं लागतं.'' हे वाक्य आईच्या चांगले लक्षात होते. दिवाळीसाठी त्या डबे घासायला घेऊ लागल्या तशी आई मला म्हणाली, ''जा गं तू विमलकडे, अगं तिला मदत कर जा. तिला कोण आहे मदतीला ? तू जा अन् तिला मदत कर.'' आम्हाला पण उलटून बोलायची काय बिशाद! मी त्यांच्या घरी गेले अन् करू लागले ना त्यांना मदत.

विमलताई अन् माझ्या आईला चमचमीत तिखट पदार्थ खायला आवडत. हल्ली नॉनव्हेज न खाणारी मुले आईला सांगतात, ''कितीतरी दिवसांत नॉनव्हेज बेत झाला नाही. आता कर हं...या रविवारी.'' तसेच विमलताई येऊन आईला म्हणत, ''अहो वहिनी, बरेच दिवसांत आपण 'रावण पिठले' अन् भाकरी बेत केला नाही हो. तुम्ही रावण पिठले करा, मी भाकरी करते.'' हा त्यांचा बेत वर्षातून एकदातरी होईच.

कधीकधी सुटी संपायच्या आत आम्ही मुले नाटक-नाच असे छोटेसे 'वाडा-गॅदरिंग' करत असू. मग छोटेसे स्टेज,पातळाचा पडदा, पडदा उघडणे-बंद करणे यासाठी एक स्पेशल मुलगा, शिट्टी वाजवणारा एक असे सर्व करत असू. नाटकाची आमची घोकंपट्टी सुटीभर चालत असे. वाड्यातील सर्व माणसांना चार वाजता नाटकाला या असे आमंत्रण जायचे. सतरंजी घातली जाई. शिट्टी वाजली की पडदा रडत-रडत दूर होत असे. त्यानंतर नाच, नाटक सुरू होई. कितीही चुकले, पदर पडले, वेणी-अंबाडे पडले तरी कोणीही हसत नसे. उलट टाळ्या वाजवत कौतुकच पदरात पडे. या गॅदरिंगप्रमाणेच सुटी संपण्याअगोदर बाहुला-बाहुलीचे लग्न थाटात साजरे केले जाई. या लग्नाची तयारीही आम्ही मुली अनेक दिवस करत असू. तुळशीबागेमधील खोट्या मण्यांचे दाग-दागिने, मुंडावळ्या करणे, छोट्या कापड तुकड्यापासून तिची साडी, ड्रेस तयार करणे, पोह्यांचा खोटा खोटा चिवडा, दाणे मध्ये भाग करून, त्यात गूळ घालून परत चिकटवून त्याचे लाडू करणे. असे सर्व झाल्यावर, सर्व घरातून बोलावणी, काही मुलांचा स्पेशल बॅण्ड, विहिणींच्या साड्या नेसणे हा प्रकार. भटजी, अक्षता, इतका कारभार पार पाडल्यावर प्रत्यक्ष लग्नविधी, अन् सजवलेल्या बाबागाडीतून तुळशीबागेतल्या रामाला पाया पडायला निघालेली वरात. पुढे बॅण्ड, मधे बाबागाडी, त्यामागे साड्या नेसलेल्या आम्ही. रस्त्यावरील लोकांनी बाबागाडीतील नवरा-नवरीचे कौतुक केले की आमची मान ताठ होई.

वर्षातून एकदा तरी वाड्यातील चौकोनी अंगणात पिठले-भाताची खास अंगत-पंगत होई. माझे वडील माडीवरील खोलीतून अंगणात प्रकाश येईल असा १०० चा दिवा घेऊन देत.

रंगपंचमीला मुले बादलीत रंगाचे पाणी घेऊन भांड्याने एकमेकांच्या अंगावर उडवत असत. त्यावेळेस पिचकारीचे एवढे प्रस्थ नव्हते. माझ्या वडिलांचे दुकान होते. ते खूप हौशीही होते. पाणी संपत आले की ते सतत बादलीत पाणी ओतत असत. आमच्या कपाटात शाईच्या बऱ्याच बाटल्या होत्या. त्यात एक फिनाईलची बाटलीपण होती. हे त्यांना ठाऊक नव्हते. उत्साहाच्या भरात ते मुलांच्या अंगावर शाई टाकू लागले. शाईच्या अनेक बाटल्यांबरोबर फिनाईलची बाटली पण रिकामी झाली. मुलांच्या आरडा-ओरड्याने अन् बाटल्या लक्षपूर्वक पाहिल्यावर झाला प्रकार लक्षात आला. सर्व मुलांचे डोळे धुणे, शेकणे हा प्रकार सुरू झाला. रंगपंचमी बाजूलाच राहिली तणाव मात्र जबरदस्त वाढला. सुदैवाने, कोणाला काही झाले नाही. दुसऱ्याच दिवशी मुले अंगणात खेळू लागली. वाड्यातील कोणीही भांडत आले नाही हे विशेष.

नागपंचमीला मेंदी लावण्याचा उत्साह. मेंदीने रंगलेल्या हातांकडे पाहत-पाहत कामे करणे, कोणाची किती जास्त रंगली हे पाहणे, 'नागोबाला-दूध' असे ओरडत येणाऱ्या गारुड्याला बोलावणे, त्याला दूध-लाह्या-दुर्वा वाहून, नेवैद्य देऊन केलेला मन:पूर्वक नमस्कार हे सारे अजूनही लक्षात राहिले आहे. नवरात्रीत आई देवीच्या घरातल्या नवरात्रीच्या कामात गुंते. तर आम्ही मुली भोंडल्याच्या तयारीत गुंतत असू. देवीला उठता-बसता तिळाच्या फुलांचे हार, सव्वाष्ण-ब्राह्मण, गोड-धोड जेवण यात आई मग्न असली तरी, तिच्याभोवती आमचे रिंगण चालूच असे, ''आई संध्याकाळी भोंडल्याला आपली अशी खिरापत कर की कोणीसुद्धा ती ओळखू शकणार नाही.''

श्रावणात पहाटे जाग येई ती गल्ली-बोळातून ओरडत जाणाऱ्या माणसाच्या आवाजाने. 'आघाडा-दूर्वा-फुलंय्' असे ओरडणाऱ्याला बोलावून, त्याला एक पैसा नाहीतर चिमूटभर धान्य दिले तरी तो हे सर्व देत असे. या आघाडा-फुलांची माळ दर शुक्रवारी जिवतीच्या फोटोवर लावली जाई. श्रावणातील महत्त्वाचा सण मंगळागौरीचा. वाड्यातील इतक्या बिऱ्हाडातील एका घरी तरी मंगळागौर असेच. अन् रात्रीचे जागरण, फुगड्या-झिम्मे यांची खैरात. आजही त्यांच्या आठवणीने सर्व अंग हलू लागते.

गणपतींची शोभा तर आगळीच. घराघरातील अन् सार्वजनिक गणपती हे पुण्याचे वैशिष्ट्य आहेत. वाड्यातील सर्व स्त्रिया-मुले रात्री आवरून सार्वजनिक गणपती बघायला जात असू. गर्दी असे पण हल्ली जसे चालताच येत नाही तसे नव्हते. चालत-चालत अनेक गणपती बघता येत होते. सार्वजनिक गणपतींची आरास, त्यांच्यापुढील देखावे, तेथील प्रसन्न व भाविक वातावरण पाहून प्रत्येकजण आपोआप नतमस्तक होत असे. प्रत्येक गणपतीपुढे रोज रात्री एखादा कार्यक्रम असे. त्या कार्यक्रमांनासुद्धा मोठी उंची असे.

वर्तमानपत्रात कोणत्या सार्वजनिक गणपतीपुढे कोणता खास कार्यक्रम आहे हे बघून त्यांना अनेकजण हजेरी लावत असत.

गणपतीनंतर दिवाळी आलीच की. आई शेजारच्या उषावहिनींना विचारी, ''अगं उषा, तू कधी चकल्या करणार आहेस गं? बुधवारी का? मग आम्ही शुक्रवारी करू. तुला सोऱ्या लागतील ना!'' पूर्वी सर्वांना द्यायला (अगदी झाडूवाली, रस्त्यावरचीसुद्धा) दिवाळीचे पदार्थ लागत म्हणून खूप मोठ्या प्रमाणात सर्व पदार्थ करत असत. उषाला चकल्या करण्यासाठी आमचा सोऱ्या लागणार म्हणून आमच्या चकल्या नंतर. वसुबारसेला वाड्यातील सर्व बायका अन् आम्ही मुले गायीची पूजा करायला जात असू. दिवाळीच्या सुमारास थंडी भरपूर. या थंडीत पहाटे कुडकुडत आईबरोबर विष्णूच्या मंदिरात काकड आरतीला जायचो. गाणी म्हणत देवाला उठवणे, स्नान घालणे, नेवैद्य खाऊ घालणे ही मज्जा न्यारीच असायची. दिवाळीत आम्हा मुलांचा आवडता उद्योग म्हणजे किल्ला करणे. माती गोळा करणे, व्यवस्थित आकार देऊन किल्ल्याचे रूप आणणे, त्यावर मोहरी पेरणे, सुकला की त्यावर चित्रांची मांडामांड करणे, एखादे चित्र कमी असेल तर त्यासाठी तुळशीबागेच्या गल्लीतून धावपळीने शोध घेणे. आपला किल्ला करताना शेजारच्या किल्ल्याकडे नजर फिरवणे म्हणजे काही बदल करून आपला नंबर पुढे आणण्यास प्रयत्न करणे. यात दिवाळी सरत असे.

रामनवमीला तुळशीबागेत जाऊन रामाला दवणा वाहण्यात येई. याच रामनवमीच्या दिवसांत मी सुधीर फडके यांचे गीतरामायण तुळशीबागेत ऐकले आहे. वटपौर्णिमेला आईबरोबर धर्मचैतन्यात जाणे, पूजा झाल्यावर आईला आंबा देणे ही आणखी एक आठवण आहे. आई पाच स्त्रियांना आंब्याचे वाण देई. आषाढी एकादशीच्या सुमारास 'पालखी पाहणे' हा सुंदर, भक्तिरसात तृप्त होण्याचा दिवस असे. ''ज्ञानबा तुकाराम, ज्ञानोबाची पालखी'' असे नाचत म्हणणारे वारकरी बघितले की आम्हा मुलांचे पायही नाचत असत. कोजागिरी पौर्णिमेला आटीव दूध आई प्रथम एका सवाष्णीला देई, दक्षिणा देई व नमस्कार करी. नंतर आम्हा सर्वांना ते मस्त दूध मिळे. मंडईत चिंचेच्या झाडावर सर्वांत उंच बांधलेली दहीहंडी पाहयला असाच सर्व वाडा जाई.

कधी दुपारच्या वेळेस पेटी घेऊन, जुनी गाणी म्हणत एक जोडपे गल्लीतून यायचे. आमच्या वाड्यात दोन/चार जण गाणारे आसामी होते. त्यामुळे त्या दोघांना वाड्यात आर्वजून बोलावून आवडीची हिंदी गाणी म्हणायला सांगणे हा एक छान रसिला कार्यक्रम असे. आम्ही सर्वजण अन् वाड्याचे अंगणही त्या आवाजात मोहरून जात असे. आम्ही मुली दुपारच्या निवांत वेळेत भातुकली खेळायचो. माझी आई पोहे, गूळ, खोबरे, दाणे हे जिन्नस खेळायला देत असे. मला आठवते, एकदा मी माझ्या मैत्रिणीला म्हटले होते, ''आज तू आण ना काहीतरी खेळायला...'' ती पुढील दोन दिवस खेळायला आलीच नाही. आई मलाच ओरडली, ''काय गं, भांडलीस की काय तू तिच्याशी?'' आईने तिला बोलावले व विचारलेसुद्धा. तिने सर्व सांगितल्यावर आई मलाच म्हणाली, ''मी देते ना भातुकलीला खाऊ तो पुरे, तिला आणायला नको सांगूस. भांडायचं नाही.''

वाड्याची ताकद प्रचंड मोठी होती. वाड्यात माधुकरी मागणारे येत असत. मी माझ्या मुलींना सहज सांगे, ''जा गं, चांभारदादांना ही चप्पल शिवायला सांग.'' झाडूवाली, भिकारीण, माधुकरीवाले यांच्याशी सुद्धा जे आपलेपणाने बोलणे होई तो त्या वाड्याचा गुण असावा.

असा हा आमचा वाडा. त्यातील सर्व घरांतील आम्ही सर्व मंडळी. भांडायचे नाही, खोटे बोलायचे नाही, चोरी करायची नाही या गोष्टी आम्ही आपोआप शिकलो. एकमेकांना मदत करणे, एकत्र राहणे, एकोपा करणे, एकरूप होणे, एकजीव होऊन काम करणे, एकीची भावना जपणे, अशा 'ए'कीची बाराखडी वाड्याने आम्हाला शिकविली. वाड्याची एकच ओसरी असते, एकच अंगण असते ही कल्पना आता नवीन पिढीला नसावी. ज्या आमच्या वाड्याला 'बावळट' हा शब्द माहीत नव्हता, तिथे 'रांडीच्ये' हा शब्द ठाऊक झाला. मी माझ्या आईला चक्क विचारलेले आठवते आहे, ''आई, 'रांडीच्ये' म्हणजे काय गं?''

पुण्यातील वाड्यांच्या जागी मोठमोठी अर्पाटमेंट्स झाली आहेत. अंगण गेले आहे. त्या अंगणातील अनेक खेळ बाद झाले आहेत. सारवणे, सडा घालणे, रांगोळी काढणे, तुळशीपुढे दिवा लावणे या गोष्टी इतिहासजमा झाल्या आहेत. आमच्या वाड्यानेही अर्पाटमेंटचा हा नवा कोट परिधान केला आहे.

मोठ्यांचा मान राखणे, आदराने वागणे-बोलणे-बसणे-उठणे अशा अनेक गोष्टी; दुसऱ्यांचा विचार करणे, कोणीही दुसऱ्याने काही सांगितले, काही सुनावले तर न चिडता आपल्या वागण्यात तसा बदल करणे, अशा कैक गोष्टी या वाड्यात आम्हाला प्राप्त झाल्या. वाडा म्हणजे कैक गोष्टींचा काढा-अर्क होता. सदैव अभिमान वाटावा असा होता हा आमचा वाडा. आम्ही वाढत असताना, आम्ही लहानाच्या मोठ्या होत असताना या वाड्याने ज्या-ज्या गोष्टी शिकवल्या त्या आम्ही कधीच विसरू शकत नाही. मुंबईत आल्यावर मी पुण्याच्या कैक गोष्टी ऐकल्या, ऐकतही असते. पण मला विचाराल तर आमच्या वाड्यातील सर्वचजण महान दिलवाले होते!

**– अनुराधा गांगल**
ए/३, अजिंक्यतारा सोसायटी,
सी.एस.टी. रोड, चेंबूर,
कुर्ला सिग्नलजवळ,
मुंबई-४०० ०७१.
फोन नं. – २५२२ १६४८

# सर्वसाधारण त्रैमासिक सभेचा अहवाल

८ फेब्रुवारी २०१० रोजी पुण्यातील त्रैमासिक बैठकीत सादर केलेला अध्यक्षीय अहवाल :-

१. आजवर नोंदणीपत्रक भरून औपचारिक सदस्यांची संख्या चाळीस झाली आहे.

२. अदमासे झालेला खर्च व जमा झालेल्या देणग्या अनुक्रमे रुपये पन्नास हजार आणि चाळीस हजार आहेत.

३. प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या माहिती पत्रकांद्वारे महाराष्ट्रातील विद्यापीठाचे कुलसचिव, प्रकाशित होणारी दैनिके-साप्ताहिके-पाक्षिके, प्रशासनातील माहिती व जनसंपर्क अधिकारी ह्यांच्याबरोबर संपर्क साधला गेला. त्यासाठी अनुक्रमे डॉ. द.ना. धनागरे, ग्रंथालीचे श्री. सुदेश हिंगलासपूरकर व श्रीमती किशोरी गद्रे ह्यांनी मोलाचे साहाय्य केले; दूरध्वनी, ई-मेल वा पत्रांद्वारे लाभलेल्या माहितीनुसार प्रतिसाद समाधानकारक होता.

४. सामाजिक मूल्ये ह्या विषयांवर आयोजित केलेल्या राज्यव्यापी स्पर्धेची प्रगती वेळापत्रकानुसार होते आहे. राज्यातील चौदा प्रकाशनांनी २००९ च्या आपापल्या दिवाळी विशेषांकात स्पर्धेसंबंधातील मजकूर समाविष्ट करून सहकार्य दिले. रुची व मिळून साऱ्याजणी ह्यांखेरीज इतर सर्व प्रकाशनांना खर्चाप्रीत्यर्थ रुपये २,५००/ह्न चे धनादेश जनसंवादने पाठवले आहेत. सुगावा प्रकाशनाने ती रक्कम देणगी प्रीत्यर्थ परत जनसंवादकडे वेगळ्या धनादेशाने सुपूर्त केली आहे. लाभलेल्या एकूण पन्नास निबंधात्मक प्रतिसादाचे मूल्यांकन करून त्या त्या प्रकाशनाने राज्यव्यापी दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांना तसे कळवले आहे आणि उत्तेजनार्थ पारितोषिकांचे वितरण केले आहे. संबंधातील माहिती वेगळ्या तक्त्यात दिली आहे. त्यानुसार, अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकोणीस स्पर्धकांच्या

**दिवाळी विशेषांकाद्वारे जनसंवादने घेतलेल्या राज्यव्यापी स्पर्धेची माहिती**

| क्र. | विशेषांकाचे नाव | प्रकाशनाचे ठिकाण | प्रतिसादांची संख्या | राज्यस्तरावरील फेरीसाठी पात्र ठरलेल्या प्रतिसादाची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | विश्रांती | पुणे | १६ | ०४ |
| २. | सुगावा | पुणे | ०० | - |
| ३. | मिळून साऱ्याजणी | पुणे | तळटीप बघा | - |
| ४. | निशांत | अहमदनगर | ०३ | ०१ |
| ५. | प्रजावाणी | नांदेड | ०० | - |
| ६. | अक्षरवैदर्भी | अमरावती | १० | ०४ |
| ७. | जनमाध्यम | अमरावती | ०८ | ०२ |
| ८. | चंद्रपूर सन्नाटा | चंद्रपुर | ०० | - |
| ९. | चंद्रपूर झेप | चंद्रपुर | ०० | - |
| १०. | गार्गी | मुंबई | ०२ | ०२ |
| ११. | रुची | मुंबई | तळटीप बघा | - |
| १२. | कदंब | विरार | ०३ | ०१ |
| १३. | रत्नागिरी | आरसा | ०३ | ०१ |
| १४. | वेंगुर्ले | किराट | ५० | १९ |

**टीप:** रुची व मिळून साऱ्याजणी ह्या प्रकाशनांचा प्रस्तुत जनसंवाद स्पर्धेशी अप्रत्यक्षपणे संबंध असल्यामुळे त्या विशेषांकांच्या वाचकांनी स्पर्धेत भाग घेण्यासाठी त्यांच्या प्रतिवाद अनुक्रमे कदंब व विश्रांती ह्या प्रकाशनांकडे परस्पर पाठवावा, अशी सूचना केली होती. कदंब व विश्रांती ह्या विशेषांकांच्या प्रतिसादात तसा समावेश आहे.

लिखाणाच्या प्रती राज्यभरातील परीक्षक मंडळांच्या प्रत्येक सदस्यांकडे जनसंवादने पाठवल्या आहेत. जागोजागीच्या परीक्षकांच्या मूल्यांकनात काही किमान सूत्रे असावीत हे ध्यानात घेऊन गरजेचे विवेचन विनंतीपत्राद्वारे सर्व परीक्षकांना पाठवले आहे. त्यांच्याकडून मूल्यांकनाचे तक्ते २२ मार्च २०१० ह्या तारखेपर्यंत तयार होऊन जनसंवादकडे रवाना केले जातील. पारितोषिकांचे वितरण जनसंवादच्या पुढील त्रैमासिक बैठकीचा योग साधून करण्यात येईल.

५. शालेय शिक्षणात समाजशास्त्राचा समावेश करण्यासंबंधीच्या जनसंवादच्या उद्दिष्टावर संबंधित क्षेत्रांतील तज्ज्ञांकडून चर्चा घडवून आणण्यासाठी जनसंवाद एक परिसंवाद योजणार आहे. त्यासाठी परिसंवाद समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीची पहिली बैठक घेण्यात आली. त्या बैठकीला डॉ. धनागरे, प्रा. पानसे व डॉ. देशपांडे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्राथमिक चर्चेनुसार परिसंवाद घेण्यापूर्वी निमंत्रितांच्या माहितीसाठी योग्य पार्श्वभूमीवर टिपण बनवण्याचा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला. परीक्षा व इतर गोष्टींचा विचार करून परिसंवाद घेण्यासाठी ऑगस्ट वा सप्टेंबर महिने योग्य वाटले; त्या दिशेने कामकाजास सुरुवात झाली आहे.

६. प्रचार व प्रसारासाठी तामिळनाडू, केरळ, आंध्र, गुजरात व मध्यप्रदेश ह्या राज्यांत व्यक्तिगत पातळीवर विषयाची रुजवात करणे सुरू झाले आहे. प्रयोग म्हणून मुंबईत काही गटचर्चा अध्यक्षांनी साधल्या; त्यांतील विशेष नोंद घेण्यासारखी गटचर्चा घाटकोपर येथील रोटरी क्लबच्या सदस्यांबरोबर झाली. ह्या गटचर्चा खूप उपयुक्त ठरल्या. हा प्रयोग अनेकांनी अनेक ठिकाणी करण्याकरिता एक वेगळे टिपण तयार करण्यात येईल. इतर राज्यांतील प्रचारासंदर्भात जनसंवादच्या माहितीचा किमान इंग्रजी व हिंदी ह्या भाषांतील उपलब्धता महत्त्वाची वाटते. काही प्रयत्न सुरू आहेत. ज्या सदस्यांना अनुवादाची अशा भाषांतराच्या कामात प्रभुत्व व रस असेल, वा परिचयात तशा कोणी व्यक्ती असतील, तर त्यांनी संपर्क साधावा.

---


## मौन होई बोलके

**रोहिणी लिमये**




**मूल्य २०० रुपये, सवलतीत १२० रुपये**

‘मूकं करोति वाचालम्’ हे आपण ऐकून असतो. मात्र हा केवळ दैवी चमत्कार नसतो. व्यक्ती मुकी का होते आणि तिला बोलते कसे करता येते, यामागे शास्त्र असते; पण त्यापेक्षा असते प्रचंड मेहनत आणि त्यांना माणूस म्हणून दिलेला प्रेमळ आधार. मुंबईत कर्णबधिरांसाठी शाळा काढून रोहिणी लिमये यांनी अनेकांना मुकेपणापासून मुक्ती देऊन व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली. कर्णबधिरांसाठी शाळा सुरू केली, उपयुक्त अभ्यासक्रम आखले. श्रवण, वाचा व भाषाविष्कारासाठी विविध साधनांची निर्मिती केली. त्यांच्यातला माणूस घडवला. या अथक परिश्रमांचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव झाला. स्वत मूक राहून, आपल्या योगदानातून बोलणाऱ्या ध्यासाची कहाणी म्हणजे ‘मौन होई बोलके.’

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011

RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

## ‘मौन होई बोलके’ पुस्तकाचे प्रकाशन




उषा मेहता, लेखिका रोहिणी लिमये, नीला सत्यनारायण, सुलभा वर्दे आणि डॉ. राजीव दळवी

## ‘कऱ्हाड : प्रीतिसंगमावरचं आदितीर्थ’ पुस्तकाचे प्रकाशन




ग्रंथाली-ज्ञानयज्ञातील या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी
महेंद्रकुमार शाह, अनिल कुलकर्णी, डॉ. जयसिंगराव पवार आणि लेखक विजय माळी

‘रुची’ हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी ‘ग्रंथाली’करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.